# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे  इतिवृत्तांत

**दिनांक २९-०३-१९९३ ते २९-०४-१९९३**

**रजिष्टर क्र.१३**

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक २९.३.१९९३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत**
**मंगळवार दिनांक २९.३९३ रोजी (अंदाजे) ठिक ११.४५ वाजता मा. महापौर श्री यादव अशोक सायन्ना यांचे अध्यक्षतेखाली "वंदे मात्रम" या गिताने विशेष सर्वसाधरण सभेचे (अंदाजपत्रकीय) सुरुवात झाले.**

या सभेस मा आयुक्त ,उप आयुक्त , तथा आधिकारी आणि खालील स. सदस्य उपस्थित होते.

१) मा. श्री. अजिम खान दादामिया अ. रहेमान
२) मा. श्री. शळके अजितकुमार लक्ष्मणराव
३) मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम
४) मा. श्री. अतिजुल्ला बेग वाहेद बेग
५) मा. श्री. पंडागळे रतकुमार नारायणराव
६) मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
७) मा. श्री. भगुरे तुळशिराम छगन
८) मा. श्री. पाटील नरेद्र यादवराव
९) मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
१०) मा. श्री. म. आयुब गुलाम जिलानी
११) मा. श्री. मुजिब आलमशा खान
१२) मा. श्री. प्रधान बंडु गोविंदराव
१३) मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१४) मा. श्री. जावेद हसनखान कासिमहसन खान
१५) मा. श्री. तकिहसन खान कासिमहसन खान
१६) मा. श्री. स.अहमद एकबालुद्दीन स. मो. कुतुबददीन
१७) मा. श्री. मिर्झा अनवरबेग हमीद बेग
१८) मा. श्री. ओक जयवंत केशवराव
१९) मा. श्री. गिल इकबालसिंग प्रितमसिंग
२०) मा. श्री. अ. रशिद खान (मामु) अ. हमीदखान
२१) सौ. श्री. दलाल लता श्रीनिवास
२२) मा. श्री. जैस्वाल प्रदिपकुमार शिवनारायण
२३) मा. श्री. हाजी मोहंमद हाफिजोददीन
२४) मा. श्री. छापरवाल रमेश नारायण
२५) मा. श्री. पालीवाल विजय गोविंदलाल
२६) मा. श्री. डॉ. सचेती चेनकरण गणेशलाल
२७) मा. श्री. म. इस्माईल अ. करीम
२८) मा. श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
२९) मा. श्री. मोहसिन अहमद बशीर अहमद
३०) मा. श्री. स. हुसेन स. अहमद
३१) मा. श्री. मगर शंकर जिजाराम
३२) मा. श्री. मानकापे नामदेवराव शामराव

३३) मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिमाजी
३४) मा. श्री. सुग्रिम हरलाल रिडलान
३५) मा. श्री. अलफखान हुसेन खान
३६) मा. श्री. वाघमारे सुदाम भानुदास
३७) मा. श्री. पेरकरी विठ्ठल कोंडाजी
३८) मा. श्री. सावे मारेश्वर दिनानाथ
३९) मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
४०) मा. श्री. डॉ. काळे शांताराम यशवंतराव
४१) मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस.
४२) मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
४३) मा. श्री. बारवाल गजानन रामकिसन
४४) मा. श्री. जहागिरदार अजिजमुकतार अहमद
४५) मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम
४६) मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
४७) मा. श्री. कुमावत अजिनाथ लक्ष्मणराव

विशेष काहीच नाही.

**संवाद** :

**सौ. लता दलाल** :- शहरातील दुभाजकातील पोल वरील जाहीरात बाबत विविध कंपन्याकडुन टेंडर मागविले असता एक एजन्सी रु ३०० /- प्रमाणे दर निश्चित करण्यास इच्छुक असतांना दुस-या एका कंपनीस रु.२५१ /- प्रमाणे पोलवरील जाहीरात देण्यास परवानगी दिलेली आहे काय ? याची माहिती द्यावी कारण रु.३०० /-ऐवजी रु. २५१ /- ला जाहिरात देणेची परवानगी दिलेली असल्यास मनपाने आर्थिक नुकसान झालेले आहे. त्यामुळे रु.२५१ /- च्या एजेन्सीतला परवानगी दिलेली असल्यास ती रद्य करण्यात यावी. अशी मी मागणी करित आहे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर** :- मा. महापौर साहेब संबधित एजन्सीजने आपल्याला लेखी निवेदन दिलेले आहे त्याप्रमाणे रु.३००/- चे परवानगी द्यावी व रु.२५१/- च्या एजन्सीजला परवानगी दिलेली असल्यास ती रद्द करण्यात यावी.

**मा.महापौर** :- ठिक आहे.मला काहीही माहिती नसल्याने याबाबत विचार करण्यासाठी चौकशी करण्यात येईल.

**श्री. अजिजुल्ला बेग** :- होल्डिंगच्या जाहिरातीचे दर निश्चित करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहेत. ते या समितीमध्ये न येता दर निश्चित का झाले ?
याची माहिती द्यावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- सदरची सभा बजेटची असल्याने मनपाला कोणत्या ठिकाणी वाढ होत असल्यास त्याबाबत दुरुस्ती करण्याचा या सभेत निर्णय द्यावा.

**मा. महापौर** :- आतापर्यन्त या बाबतीत कोणत्याही एजन्सीजने निर्दशनास ही बाब आणुन दिलेली नाही. तरिही चौकशी करुन निर्णय देण्यात येईल.

**श्री. मोरेश्वर सावे** :- आज विशेष सर्वसाधरण (बजेट) सभा ११.०० वाजता असूनही ११.४५ वाजता सुरु झाली व बजेटच्या व्यतिरिक्त इतर बाबीवर चर्चा करण्यास आपण परवानगी देत आहात. याचा निषेध म्हणुन मी सभा त्याग करित

आहे.(वेळ अंदाजे वाजता स. सदस्याचाही सभा त्याग केवळ स. सदस्य प्रदिप जैस्वाल बगळता

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- मनपाचे जवळपास रु.१/- लखाचे नुकसान या जाहिरातीच्या संदर्भात होत असतांना ही बाब सभागृहाच्या निर्दशनास आणुन दिलेली आहे.

**श्री. नरेंद्र पाटील** :- ज्या स. सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याच पक्षाच्या स. सदस्याच्या दुस-या सदस्यांनी बहिष्कार टाकलेला आहे. तेव्हा यावर चर्चा होऊ नये (सभा त्याग केलेल्या सेना सदस्यांनी सभागृहात प्रवेश स. सदस्य श्री. मोरेश्वर सावे सोडुन)

४८) **मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल**

**विषय क्र. १४०/१ :-** सन ९२.९३ चे सुधारीत अर्थासंकल्प व सन ९३-९४ अर्थसंकल्पास मजुरी देणे बाबत.

**श्री. अविनाश कुमावत** :- मागील बैठकीत जवाहर कॉलनी पोलीस चौकी येथुन हलविण्याबाबत आश्वासन दिलेले होते त्याबद्दल काय झाले. कृपया माहिती द्यावी.

**श्री. शांताराम काळे** :- आज अंदाजपत्रकीय सभा असल्याने केवळ याच विषयावर चर्चा व्हावी. इतर बाबीवर चर्चा करता येऊ शकत नाही.

**मा. महापौर** :- मागील बैठकीत सुचित केले होते की, जवाहर कॉलनी पोलिस स्टेशनच्या बाबतीत सबंधितांना नोटीस देण्याचे ठरवलेले होते . ते सांगण्यात येईल. यानंतर पुढे कोणत्याही बाबतीत बजेट शिवाय चर्चा करता येणार नाही. कृपया सर्वांनी नोंद द्यावी.

**मा. आयुक्त** :- मागील बैठकीत जवाहर कॉलनी पोलीस स्टेशन रिकामे करुन देणे बाबतची जी चर्चा झाली त्या अनुषंगाने प्रशासनाने पोलीस आयुक्तना नोटीस दिलेली आहे. आणि दि.६.४.९३ ला पोलीस कार्यालयाचा प्रतिनिधी याबाबतच्या चर्चेसाठी मनपामध्ये बोलविण्यात आलेला आहे. आणि ती चर्चा झाल्यानंतर अंतिम नोटीस पोलिस कार्यालयाला द्यावी लागणार आहे ही पहिली नोटीस दिलेली आहे.

**श्री. अविनाश कुमावत** :- अंदाजपत्रक (बजेट) जाहिर होण्यापुर्वीच एका वर्तमान पत्रात संपुर्ण बजेटची माहीती छापुन आलेली आहे. तेव्हा कुणी माहिती दिली बजेट मंजुर होण्यापुर्वी माहिती वर्तमान पत्रात छापुन येणे योग्य आहे काय ? याची माहिती छापलेली असेल.

**मा. महापौर** :- स्थायी समिती सभा (विशेष सर्वसाधरण) अंदाजपत्रकीय सभा संपन्न झाली. त्या आधारे संबंधीत वर्तमान पत्राने माहिती छपलेली असेल.

**मा.महापौर** : या बाबत स्थायी समिती सभापती माहिती देतील.

**श्री. इकबालसिंग गिल** :- फेब्रवारीच्या ११ तारखेला मुळ सुधारित अंदाजपत्रकीय विशेष सर्वसाधारण सभा स्थायी समितीची संपन्न झाली या सभेमध्ये ठरल्याप्रमाणे वर्तमान पत्रात बातमी छापुन आलेली आहे आणि .

**मा. महापौर** :- वर्तमान पत्रात छापुन येऊ शकते का ?

**श्री. इकबालसिंग लाल** :- होय. छापुन येऊ शकते. असे कुठे लिहिले आहे की. वर्तमान पत्रात छापण्यास परवानगी देऊ नये. असे काहीही नाही. त्यामुळे वर्तमान पत्रात बजेट विषयी छापुन येणे ही बाब

**श्री. प्रदिप जैस्वाल**

**सौ लता दलाल** :- मनपाच्या आर्थिक नुकसानीचा प्रश्न असल्याने व आजची बजेट बाबतीत सभा असल्याने त्यावर निर्णय व्हावा.

**श्री. शांताराम काळे** :- आर्थिक बाब गेल्या चार वर्षापासून आजच कसे कळाले.

**सौ लता दलाल**

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- आमच्या समोर ही बाब आजच असल्याने सभागृहाच्या निर्दशनास आणुन देण्यात येते तो पर्यन्त प्रकरण स्थगीत ठेवावे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर** :- सर्व स. सदस्यांना वाटप करण्यात आलेल्या प्रतिमधील बजेटच्या कॉपीसह काही इंग्रजीतील टाईप केलेले प्रति वाटप केलेले आहेत तेव्हा त्या प्रति मराठीतून का दिल्या गेल्या नाही. आम्हाला इंग्रजी येत नाही व महाराष्टात मातृभाषा मराठीतुन सर्व व्यवहार चालु असतांना इंग्रजीतुन प्रति का वाटप केल्या याची माहिती द्यावी. याबाबत महाराष्टाचा अपमान आपण करीत आहात असे दिसून येते.

**श्री. जयवंत ओक** :- स. सदस्याच्या भावना लक्षात घ्याव्या.

**श्री. नारायण फत्तेलष्कर** :- जोपर्येत मराठीतून प्रति आम्हाला मिळत नाही तोपर्यन्त ही बैठक होऊ देणार नाही.

**मा. महापौर** :- ही प्रत दिलेली मी बजेटची नाही. ती शासनाकडे पाठविण्यात आल्याची खर्चाची माहिती आपण सर्वोना माहितीस्तव दिलेली आहे. कृपया आपण बजेटच्या चर्चा करावी.

**श्री. मोतीराम घडमोडे** :- जे स. सदस्य निषेध करुन सभा त्याग केला व बाहेर गेले त्यांचे सोबत इतरही स. सदस्य गेले होते. ते परत आले परंतु नेमके तेच स. सदस्य आले नाहीत म्हणजे त्यांना बाहेर काम होते म्हणुन सभात्याग केला व बाहेर गेले आहे काय ?

**मा. महापौर** :- तो त्यांचा प्रश्न आहे. आता इतर बाबीवर चर्चा न करता बजेटवर चर्चा व्हावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- मनपाची आर्थिक बाब लक्षात घेता जाहिरातीच्या एजन्सीला चौकशी करे पर्यन्त स्थगिती द्यावी.

**मा. महापौर** :- संबधित संचिका महापौराचे कक्षेत ठेऊन चौकशी करण्यात येईल.

**श्री. नारायण फत्तेलष्कर** :- मी मागणी केल्यानुसार मला मराठीतुन माहिती द्यावी.

**मा. महापौर** :- शासनाकडे कामांच्या यादिसह लागणा-या खर्चाची माहिती पाठविली होती ती माहिती आपल्या सर्वोना माहितीस्तव दिलेली आहे. या माहितीचा व अर्थसंकल्पाचा काहीही संबंध नाही.

**श्री. अजिजुल्ला बेग** :- खुलताबादच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे शासनाच्या तरतुदीतुन जो विकास कामासाठी खर्च करण्यात येतो त्याची माहिती यादीसह बजेटच्या बैठकीत द्यावी. त्याप्रमाणे कार्यवाही झालेली आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर** :- स. सदस्यांना दिलेली माहितीची प्रत माझ्याकडे ही आहे व ती मराठीतुन आहे.

**श्री. इकबालसिंग गिल** :- सन १९९१-९२ चा मुळ अंदाज पत्रस व सन ९२-९३ चा सुधारित अंदाजपत्रक मी स्थीयी समितीचे वतीने मा महापौर यांचेकडे सादर करीत आहे (यावेळी सभापती मा. महापौर यांना अंदाजपत्रक सादर करतात)

**श्री. गिरजाराम हाळनोर** :- माझ्या वार्डातील मो. ज्योतीनगर येथील रस्त्याच्या बाबतीत दोनदा खर्चाची तरतुद दाखविलेली आहे. कृपया माहिती द्यावी.

**श्री. शांताराम काळे** :- शासनाकडे माहिती दाखवित असतांना असे दाखविणे आवश्यक असते तरिही संबंधित विभागाने माहिती द्यावी.

**मा. महापौर** :- या वार्डातील एखादे (w.b.m)चे काम वैगैरे असेल संपुर्ण वार्डात एकच रस्ता आहे काय . इतरही कामे असु शकतील त्याप्रमाणे तरतुद केलेली असेल.

**श्री. बंडु प्रधान** :- बजेटमधील पान क्र.३ मध्ये झोपडपट्टीत सुधारणा यामध्ये स्लम भागासाठी मागील वर्षी रु.१ कोटी १० लाख तरतुद होती ती आता ६० लाख रु. आहे तेव्हा यामध्ये वाढ करावी. कारण शहरात स्लम व १२ खेडी यामध्ये बरेचसे नागरिक राहतात. त्याचेसाठी सदरची तरतुद अल्पशी आहे. कमकुवत घटकासाठी ५%आहे ती १५% करावे लागणार आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- औरंगाबाद शहराचा मनपा अर्थसंकल्प करता आहे याची माहिती द्यावी व बजेटचे प्रास्ताविक करावे.

**श्री. इगबालसिंग गिल** :- मुख्य लेखा परिक्षक याची माहिती देतील.

**मा. महापौर** :- (अर्थ संकल्पातील (बजेटमधील) प्रास्ताविक माहिती सभागृहात वाचून दाखविले)आता स्थायी समितीचे सभापती हे प्रास्ताविक करतील.

**श्री. नामदेव मानकापे** :- इगबालसिंग गिल यांच्या नावापुढे ॲड हे शब्द का घातले नाही.

**मा. महापौर** :- सर्व स. सदस्याच्या समोर सुचित करण्यात येते की, यापुढे ॲड. इगबालसिंग गिल अशी नोंद करावी.

**श्री. इगबालसिंग गिल** :-(अर्थसंकल्पातील) बजेटचे प्रास्ताविक माहिती सभागृहात वाचुन दाखविल)"यानंतर रितसर अर्थ संकल्पात सुरुवात झाली"

**श्री. बंडु प्रधान** :- मागील वेळी स्लम भागासाठी रु १ कोटी १० लाख होते आता यावेळी झ-ोपट्टीत सुधारणा साठी कमी तरतुद केलेली आहे तीत वाढ करण्यात यावी.

**मा. महापौर** :- शासकीय अनुदान व इतर मिळुन रुपये १ कोटी १९ लाखाची तरतुद यामध्ये आहे. कृपया वाचुन घ्यावे.

**श्री. बंडु प्रधान** :- रु १ कोटी १० लाखा ऐवजी रु १० लाखाची तरतुद करुन तसेच विशेष घटक योजनेमध्ये ५% च्या ऐवजी १५% करावी. कारण शहरात स्लम व नव्याने समावेश करण्यात आलेल्या १८ खेडयामध्ये बरेचसे नागरीक राहतात त्यांना त्या योग्य सुविधा मिळणे आवश्यक आहे. यासाठी वाढ करण्यात यावी.

**श्री. नरेंद्र पाटील** : १) गेल्या चार वर्षामध्ये कालवधीत शहरातील एखादया वस्तु किंवा इमारती (संत एकनाथ रंगमंदिर सन १९८८ सोडुन) मनपाने केलेल्या नाहीत स्टेडीयमसाठी रु १ लाख व २ लाखाची तरतुद केलेली होती. त्याबाबत काय झाले याची यामध्ये नोंद नाही. २) गेल्या चार वर्षामध्ये अनेक दुरुस्त्यासाठी प्रतिवर्षी रु ८ लाखाची तरतुद केलेली असते या खर्चामध्ये आतापर्यन्त एक तलाव पुर्ण झालेला असता. ३) शहरातील महिला प्रसाधनासाठी रु २ लाखाची तरतुद आहे. परंतु पुरुष प्रसाधनासाठी यांत तरतुद दिसत नाही. ४) नेहरु रोजगार योजने अंर्तगत तीन शिर्षाखाली पैसे खर्च कुठेही झालेले नाही. त्यामुळे शासनाकडे वर्षाच्या इतिहासात सेंटर हेडखाली फक्त दोन स्लमसाठी खर्चाची विभागाणी झालेली आहे. बाकी चार वर्षात दोनशे व्यक्तीचे सेंटरचे पैसे खर्च कुठेही झालेले नाही. त्यामुळे शासनाकडे पैसे परत जातात. या बाबत वर्तमान पत्रात सुध्दा बातमी प्रसिध्दीस आलेली आहे की, नेहरु रोजगार योजनेतील बँकेचे पैसे परत

जातात याबाबत योग्य तो खर्च केल्या जात नाही. याचे नेमके कारण काय आहे ते शोधले पाहिजे रु ४० ते ५० लाखाची तरतुद या ठिकाणी केलेली आहे तिचा उपयोग योग्य रितीने होतो किंवा नाही याचा विचार व्हावा.

**श्री. अजिजुल्ला बेग** :- मी उर्जा मंत्री डॉ. पद्मसिंहजी पाटील मा. रामराव आदिक . अर्थमंत्री महाराष्ट्र राज्य तसेच मा. महापौर सभापती स्थायी समिती सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता व इतर सदस्ययांनी औरंगाबाद शहराच्या विकास कामासाठी शासनाकडुन रु ५.१० लाख मंजुर करवुन घेतली त्याबाबत विशेष अभिनंदन करित आहे.त्या खर्चाची तरतुद या बजेटमध्ये करणे आवश्यक आहे.

**श्री. अविनाश कुमावत** :- मा. आमदारांनी प्रयत्न करुन अनुदान मंजुर करायला लावले यांचेही अभिनंदन करण्यात यावे. मंजुर झालेले अनुदान अद्यापही मिळालेले नाहीत.

**श्री. रशिद मामु** :- स. सदस्यांनी, मांडलेल्या सुचनेनुसार मी मा. महापौर व आमदार विरोधी पक्ष नेत्यांचा निषेध करतो की, नागरिकांचे मांगणीनुसार ५.१० लाखाची मंजुरी मिळावी जेणे करुन विद्युत मंडळाकडुन सहकार्य मिळत नाही. लाईटचे मिटर बाबत याबाबत जे मंबुईला पदाधिकारी गेलेत ते केवळ फिरुन आलेत. त्यांनी काही. केलेले नाही. जनतेच्या मागणीनुसार मंजुरी मिळालेली आहे. की लाईटच्या ज्या बाबातीत काही अडचणी आहेत त्या बाबत सभागृहात ठराव पास झालेला आहे.

**मा. महापौर** :- स. सदस्य आपणास सुचित करण्यात येते की. अगोदर प्रस्ताव मंजुर झ्ााल्यानंतर ते इतिवृत्त कायम केल्यानंतर शासनाकडे पाठविल्या जाते. त्यानंतर पुढील कार्यवाही होते.

**श्री. नामदेव मानकांपे** :- माझ्या वार्डातील नेहरु रोजगार योजने संदर्भात अंदाजे २०० ते २५० लोकांची अर्ज केले परंतु त्या लोकांची फाईली पंजाब ॲन्ड सिंध बँकेत पाठविल्या जातात याचे कारण काय? इतर बँकेत का पाठविल्या जात नाही . तरी संबंधित बँक रुपये ५०००/-प्रत्येकी डिपॉझीट ठेवावे असे सांगते तेव्हा गरिब लोक कोठुन डिपॉझीट ठेवतील याचा विचार होणे आवश्यक आहे २५०/- पैकी फक्त पाच लोकांना कर्ज प्रकरणे निकाली निघालीत बाकीचे काहीही झालेले नाही. मग अशा बँकेत डिपॉझीट ठेवणे किंवा नेहरु रोजगार योजनेचा अर्थ काय?

**श्री. आविनाश कुमावत** :- स. सदस्याचे असे म्हणने आहे की, बँकेमध्ये कोणतीही फाईल वशिल्या शिवाय मंजुर होत नाही त्यावर न्याय द्यावा.

**मा.महापौर** :- याबाबत संबंधित नगरसेवक यांनी विरोधी पक्ष नेता किंवा मला सांगावे की त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. अलफखान** :- बजेट पुस्तिकातील काही दुरस्त्या किंवा सुधारणा करावयाच्या झाल्यास मधोमध चर्चा न करता पान क्र.१ पासून सुरुवात करावी.

**श्री. नरेंद्र पाटील**

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- दरवर्षी स्टेडियमसाठी तरतुद केल्या जाते. परंतु पत्यक्षात काहीही काम होत नाही.

**मा. महापौर** :- याबाबत प्रकरण लवकरच निकाली काढल्या जाईल.

**श्री. अलफखान** :- याबाबत प्रकरण लवकरच निकाली काढल्या जाईल.

**श्री. अलफखान** :- पान क्र.१ मध्ये अग्निशमन करामध्ये २९ लाख दाखविले आहे. त्यामध्ये वृक्षकर २२ लाख आहे. म्हणजे प्रत्येकी ५० पैसे फिक्स यामध्ये ४.३० लाख रुपये नफा होतो. तशी दुरस्ती होणे आवश्यक आहे. कारण आमचे दर फिक्स असल्याने कमी जास्त होणार नाही. तर पान क्र.८ मध्ये रस्ता कर आहे त्याचे दर ५० पैसे प्रमाणे १६.५० लाख होतात त्यानुसार ८.२५ लाख नफा होतो. पंरतु आपण १८.००लाख रुपये या ठिकाणी दर्शविले आहे यामध्ये दुरस्ती व्हावी. अशा प्रकारची पध्दत बरोबर नाही. पान क्र. ४ मध्ये शिक्षण कर ५० पैसे प्रमाणे लावलेला आहे. त्या नुसार ७.८२ लाख दर्शविलेले आहे. या ऐवजी ८.२५ लाख होणे अशी दुरस्ती व्हावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- पान क्र. १ वर सर्वसामान्य कर ९३-९४ मध्ये ६.२५ लाख ठेवण्यात आलेला आहे तो ९२-९३ ला ६ कोटी ठेवण्यात आलेली होती. तर माझी विनंती आहे की, गेल्या वर्षी सामान्य कर किती वसुल झाला याची माहिती द्यावी.

**श्री. अजिजुल्ला बेग** :- सन १९९२-९३ मध्ये मालमत्ता करात ५.३० कोटीचे तरतुद ठेवलेली होती.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- तरतुद करुन ठेवल्यानंतर प्रत्यक्षात किती वसुली झाली याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** :- याबाबत संबंधित अधिका-यांनी माहिती द्यावी.

**मा. उपआयुक्त** :- औरंगाबाद मनपाने फेब्रुवारी ९३ पर्यन्त ४ कोटी ६१ लाख रुपये वसुल केलेले आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- बजेटमध्ये ६.२५ कोटी तरतुद ठेवलेली आहे. त्याऐवजी ५.०० कोटीची तरतुद ठेवावी. कारण इतकी वसुली होणे आवश्यक आहे . अन्यथा बजेट जास्तीचे ठेवून काहीच फायदा नाही.ज्यामुळे प्रशासनावर ही. ताण पडु नये.

**श्री. अजिजुल्ला बेग** :- सदरील खर्च अपेक्षित दाखविलेला आहे.

**मा. महापौर**: अपेक्षित खर्च दाखविलेला आहे व ते आवश्यक असुन दिलेले टारगेट पुर्ण करणेसाठी प्रयत्न करावे लागणार आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- पान क्र. १ मध्ये जकात विभागाकडुन गेल्या वर्षी किती उत्पन्न प्राप्त झाले याची माहिती द्यावी कारण ही माहिती अत्यंत गरजेची आहे.

**श्री. शांताराम काळे** :- मागील वर्षीचा आराखडा विचारणे योग्य नसुन खुल्ताबाद बैठकीत यावर चर्चा झालेली आहे. आणि नंतरच प्रोव्हिजनल बजेट तयार करण्यात आलेले आहे. केवळ प्रसिध्दीसाठी बोलत राहणे योग्य नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- मी याच्यासाठी प्रश्न उपस्थित केलेला होता की, मागील वर्षी १५ कोटीचे तरतुद असेल तर यावर्षी कमी जास्त करता येईल यासाठी माहिती मिळणे आवश्यक आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग** :- यामध्ये मालमत्ता कराचे बाबतीत माझी सुचना आहे की, रुपये ५००/- चे वर कर आसल्यास त्यांना हप्ते पाडुन द्यावेत म्हणजे वसुली जास्तीची होईल.

**श्री. गजानन बारवाल** :- रेल्वेस्टेशन येथील ओव्हर ब्रिजसाठी रु.९५ लाख खर्च होण्याची शक्यता आहे व तशी डिमांड आहे. या ऐवजी रुपये ४५ लाखाची तरतुद यामध्ये करण्यात यावी.

**श्री. अलफखान** :- बजेट वरच चर्चा व्हावी. इतर बाबतीत चर्चा होऊ नये.

**मा. महपौर** :- जकात अधिक्षक यांनी माहिती द्यावी.

**श्री. जकात अधिक्षक** :- प्रत्यक्ष जमा १९९१-९२ मार्चच्या २७ तारखेपर्यन्त १३.४५ कोटी रुपये जमा आहेत.

**मा. आयुक्त** :- सन १९९१-९२ मध्ये जकातीचे उत्पन्न १२.९७ कोटी उत्पन्न झाले आहे.आणि १९९२-९३ चे फेब्रुवारी पर्यन्त १३.४५ कोटीचे वसुली झालेली आहे.

**श्री. गजानन बारवाल** :- पोलसाठी मागील वर्षासारखे अंदाजपत्रकांत तरतुद ठेवावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- पान क्र. २ वर (५क) नाथ मार्केट बाबत सन १९९३-९४ बाबतीत १४.०० लाखाचे बजेट ठेवलेले आहे परंतु इतके भाडे वसुली कधी केल्या जाईल याची माहिती द्यावी. कारण की, गेल्या बैठकीत स्थायी समितीने नियमामध्ये बसत नसताना ही सुपर मार्केट येथील खोल्याचे भाडे कमी करण्यात यावे असा निर्णय झालेला आहे. आणि या ठिकाणी आपण १४.०० लाखाची अपेक्षा का ठेवतो.

**मा.महापौर** :- त्या ठिकाणचे दुकाने भाडयाने लवकर जात नसल्याने असा निर्णय आलेला आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- संबंधित भागातील दुकाने विकलेली आहेत आणि त्याचे भाडेही मिळत आहे. तरही त्यांचे भाडे कमी करण्यात यावे. असा निर्णय घेतलेला आहे. ज्यामध्ये टेडर मागवुन संबंधिताकडुन भाडे डिपॉझीट घेतलेले असुनही भाडे भरत असतांनाही स्थायी समितीने हा निर्णय का घेतलेला आहे.

**मा. महापौर** :- आपली सुचना योग्य आहे. या ठिकाणी भाडे मिळत असतांनाही त्याचे सर्वसाधारण सभेत मांडावी.

**श्री. इगबालसिंग गिल** :- सुपर मार्केट मधील जेवढे दुकाने आहेत तेथील सर्व दुकानाचे भाडे कमी करण्यात आलेले आहेत.

**श्री. शांताराम काळे** :- सभागृहात बोलतांना स्पष्ट बोलावे की, तेथील भाडेकरुनी टेंडर भरुन डिपॉझीट भरलेले आहेत तेव्हा इतर विषयावर पुन्हा बरीच चर्चा होणार आहे. कृपया वेळ वाया घालवु नये.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- मी तेच सांगतो की, टेंडर मागवुन डिपॉझट भरल्यानंतरही दुकाने पझ -ेशनमध्ये घेतल्या नंतरही स्थायी समितीने असा निर्णय का घेतला ज्यामुळे बजेटमधील केलेली तरतुद कमी होईल.

**मा. महापौर** :- मा. आयुक्त माहिती देत आहेत.

**मा. आयुक्त** :- सुपर मार्केट मधील दुकानाचा भाडयाचा मुद्दा उपस्थित झाला त्याची पार्श्वभुमी आपण समजले पाहिजे. पाहिल्यांदा दुकानांची जी भाडे ठरलेली होती ती आपण वाढविण्याचा निर्णय घेतला आणि त्या वाढीला स्थायी समितीने मंजुरी दिली. त्यानंतर कार्यवाही सुरु झाली. परंतु आता जी भाडे वाढलेली होती त्याबाबत नगररचना विभागातील सत्याने क्षेत्रफळाच्या आकारानुसार भाडे वाढलेली होती त्यामुळे मुळ भाडी व वाढलेलली भाडी या मध्ये अंतर निर्माण झालेले होते. उदा ज्या भाडयाची रु .१२५/- किंमत होती ती ५००-६०० रुपय पर्यन्त किंमत नगररचना विभागाच्या सल्याने गेली या वाढलेल्या दरांना स्थायी समितीने मंजुरी दिलेली होती ती कार्यवाही सुरु केलेली होती त्यामुळे सर्व दुकानदारांनी भाडी द्यावयाची नाही असा निर्णय घेतला म्हणून सर्व दुकानदारांना चर्चोसाठी बोलविण्यात आले की, याबाबत काहीतरी तडजोड निघावयास पाहिजे ज्यावेळी स्थायी समिती समोर हे भाडेकरु आले व आयुक्तांकडेही भाडेकर आले तेंव्हा सर्व भाडे करुनी

सर्वसामान्यपणे पुर्वीचे जे भाडे ते होते त्यापेक्षाही २५% भाडेवाढ करावी असा निर्णय त्यावेळी झाला त्याप्रमाणे दुकानदारांनी मान्य केले. आता या प्रकरणात सुपर मार्केटची मुळ भाडी होती तयामध्ये २५% वाढ अपेक्षीत होती. परंतु सध्याची जी प्रचलित भाडी कमी करण्याच्या संबंधित स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे. आणि यासाठी स. सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला त्यानुसार मुळ भाडे प्रस्तावित होते व त्याचे भाडे वसुल करीत होतो त्यामध्ये कमतरता केलेली आहे म्हणुन हा प्रश्न उपस्थित झालेला आहे यामध्ये १४.०० लाखाची अपेक्षा बजेट मध्ये धरलेला आहे. तेंव्हा स्थायी समितीच्या निर्णयाने कदाचीत १३.०० किंवा १२.०० लाख होण्याची शक्यता आहे.

**श्री. इगबालसिंग गिल** :- सुपर मार्केट येथील दुकानासाठी भाडेवाढ झाल्याने कोर्टात धाव घेणार होते त्यावेळी त्यांनी निवेदन दिले की, जोपर्यन्त भाडेवाढ कमी करण्याचे आश्वासन देत नाही तो पर्यन्त आम्ही गप्प बसणार नाही त्यावेळी स्थायी समितीने असे ठरविले की, कोर्ट प्रकरण न करता भाडे कमी करण्याचे संदर्भात काही तडजोड करता येईल काय ?यावर चर्चा केली त्यानुसार हा निर्णय घेण्यात आला.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- या भाडया बाबत ज्यांनी टेंडर भरले त्यांचे दर जास्तीचे असतांनाही कमी असलेले दरांना स्विकारण्यात आली याचा अर्थ काय ? जर संबंधित आधिका-यांना माहिती द्यावयास सांगावे की जे भाडे करु आहेत ते जुने दराने द्यावयास तयार आहेत किंवा नाही.

**मा. महापौर** :- स्थायी समितीमध्ये निर्णय झालेला आहे. जर तो निर्णय आमान्य करावयाचा झाल्यास सर्वसाधारण सभेत निर्णय घेऊन प्रकरण निकाली काठता येऊ शकते.

**श्री. अजिजुल्ला बेग** :- पान क्र.२ मध्ये पोट विभाग (ब) मध्ये जे दर्शविलेली आहे त्या बाबत महापालिकेकडे विशेष फंडाची तरतुद नाही. परंतु जेवढे काही रजिष्टर्ड गुत्तेदारांची डिपॉझीट रक्कम ही एफ डी आर मार्फत घेतो आणि एफ डी आर बँकेत जमा होते. तेव्हा रुपये १ कोटी पर्यन्त रक्कम महापालिकेत जमा होते तर ती रक्कम ५ वर्षासाठी बॅकेत महापालिकेने फिक्स करावी ज्यामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडेल. असा निर्णय आपण घ्यावा.

**मा. महापौर** :- आपली सुचना योग्य आहे.

**सौ. लता दलाल** :- पान क्र. २ वर जाहिरात कर बाबत जे ५.००लाखाची अपेक्षित खर्च आहे त्यामध्ये शहरातील दुभाजकांमध्ये विद्युत पोलवर जी होल्डींगची जाहिरात देणार आहेत ते कमी दराचे न देता जास्त दराने दिल्यास महापालिकेच्या उत्पन्नात ५.०० ऐवजी ७.०० लाख उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे.

**श्री. अविनाश कुमावत** :- पान क्र ३ मध्ये हाडे व विक्रीसाठी रु २०.०० लाख अपेक्षित घरलेले आहे. तेंव्हा त्यात वाढ करुन जादा दराने दिल्यास ती ५०.०० लाख अपेक्षित होण्याची शक्यता आहे.

**मा. महापौर** :- तसे करणे शक्य नाही.

**श्री. अलफखान** :- पान क्र. ५ मध्ये रो.ह.यो. मधील रिवेट आहे येथे् ५० हजार होते. परंतु ५.०० लाखाची अपेक्षा ठेवलेली आहे. जी कशी मिळेल. २५.०० लाख रु. शासनाकडे रो.ह.यो. तर्फे देत असल्यामुळे रु. ५.०० लाख मिळणे. शक्य

नाही तर ५० हजाराची अपेक्षा धरावी म्हणजे ४.५० लाख तोटा होईल अशी दुरस्ती व्हावी.

**मा. महापौर** :- मुख्य लेखा परिक्षक यांनी माहिती द्यावी.

**मुख्य लेखा परिक्षक** :- स. सदस्यांनी सुचित केल्या नुसार २% शिबीर प्रमाणे ५.०० लाखाची अपेक्षा आहे. ते मागील वर्षाप्रमाणे ठेवलेले आहे ते कट केलेले नाही आता शासनाकडे पाठवित असतांना पुढील वर्षी कट करुन पाठविण्यात येईल.

**श्री. अलफखान** :- यामध्ये दुरस्ती व्हावी की रो. ह. यो. साठी रु २५.०० लाखातुन २% रिबेटसाठी ५ हजार मिळणार आहे.

**मा. आयुक्त** :- रो.ह. यो- ची रिपोट २% दाखविलेली आहे. आपल्या महानगरपालिके मध्ये गेल्या ३-४ वर्षामध्येही रिबीट वसुल केलेले नव्हते म्हणुन या वर्षाची व गेल्या ३-४ वर्षाची मिळुण ५.०० लाख अपेक्षीत आहे. स. सदस्य श्री. अलफखान यांनी सुचित केल्याप्रमाणे रु. ८०.०० लाखाला रु १.६० लाख मिळणार जर सामान्यपणे ३.५० लाख अपेक्षित राहील अशी दुरुस्ती व्हावी.

**श्री. अलफखान** :- खुल्ताबाद बैठकीत रो.ह. यो. बाबत जी सुचना केलेली आहे होती ती रिबीट बाबत ती सुचना ग्राहय धरली नाही. तरिही यात नफा दाखविला.

**श्री. अजिजुल्ला बेग** :- (ड) ६ मध्ये दर्शविलेले आहे की, महाराष्ट्र शासनाने शैक्षणिक करातील रिबीट म्हणुन १.६० हजार.

**श्री. प्रकाश जावळे** :- पान क्र ४ व ५ मध्ये प्रकल्प विभागातील असलेला संबंधित भागात स्लम घातला व स्लमच्या संबंधित भागात प्रकल्प घातला झोपडपट्टी सुधारणा व म्हाडा हे दोन्हीही डिलीट करुन स्लमच्या ठिकाणी द्यावा.

**मा. महापौर** :- यांच्यच संबधित पान क्र. २४ मध्ये दर्शविलेले आहे.

**श्री. प्रकाश जावळे** :- स्लमचा खर्च प्रकल्प विभागाकडून करीत नाही. म्हणुन यात दर्शविलेल्या खर्चाची दुरुस्ती व्हावी.

**श्री. बंडु प्रधान** :- पान क्र.७ मध्ये नोकरांना घर बांधणी अग्रीम बाबत ६.०० लाख आहे ते १५.०० लाख करण्यात यावे.

**मा. महापौर** :- ते वसुली बाबत आहे.

**श्री. मोतीराम घडामोडे** :- मा. आयुक्तांनी लिहिलेल्या पान क्र.५ वरील निवेदनाची माहिती विचार की त्यात नमुद केल्याप्रमाणे खर्चास बंदन घालण्याचा आमचा मानस आहे. तेंव्हा गेल्या वर्ष भरात किती खर्च कपात केला याची मला माहिती नाही. त्यांनी तो तपासाचा परंतु मागील वर्षा प्रमाणे पाहता इंधन व दुरुस्ती १ (ब) वर इंधना वरील खर्च रु ४५.०० लाख होती तर विद्युत एकत्रीकरणाला रु १०.०० लाख होतो म्हणजेच रु ६८.०० लाख इंधनावर खर्च होतो तर दुरध्वनी व नविन दुरध्वनी साठी १२.५० लाखाची व्यवस्था ठेवलेली आहे म्हणजे एवढा खर्च कशासाठी करावयाचा हा मुळ प्रश्न आहे जर पान क्र. ६ वर झोपडपट्टी सुधारणा मध्ये पॅरेग्राफ ५ वर व शाळेच्या शिक्षण सुधारणेवर ५.०० लाख ठेवलेले आहेक व पुन्हा स. सदस्यांच्या स्वेच्छा निधितून रु.१० हजाराची मागणी केलेली आहे. पेट्रोल इंधन व दुरुस्तीवर आळा घालणे आवश्यक आहे. पोहण्याच्या तलावावर पुन्हा रु ८.०० लाखाची तरतुद आहे परंतु अद्यापही सुरुवात नाही. वाळुज अग्निशमन बाबत ७.०० लाखाची तरतुद आहे परंतु वाळुजची लोक मनपामध्ये येण्यास तयार नाहीत आणि तो भाग हस्तांतरीत झालेला नाही

त्यामुळे त्या भागातील जनते कडून अग्निशमन कर वसुल करणे शक्य नाही तर सिडको कडुन वसुल करणे शक्य आहे. शाळा,इमारत दुरुस्तीवर व फर्निचर खरेदीसाठी तरतुद जादा ठेवावी तसेच शहरातील स्मशान भुमी बाबतही योग्य ती देखभाल व्हावी परंतु इंधन खर्चावर कपात करावी अशी सुचना मांडतो.

**श्री. नामदेवराव मानकापे** :- पान क्र. १३ वर औषधी खरेदी बाबत २० लाख अपेक्षित आहे. तो ३० लाख करण्यात यावा.

**मा. महापौर** :- ठिक आहे.

**श्री. तकी हसन खॉंन** :- पान क्र.१४ मध्ये औषधी खरेदी बाबत बरेचशे आरोग्य केंद्र सुरु होत आहेत त्यासाठी रु ८.५० लाखा वरुन रु १२.०० लाख वाढ करण्यात यावी.

**मा. महापौर** :- १२.०० लाखाची वाढ करण्यात येते

**श्री. नामदेव मानकापे** :- पान क्र.१६ वर कोंडवाडयातील वेतन मध्ये वाढ करण्यात यावी तसेच चराई ५० हजार आहे तीत ७५ हजारांची वाढ करावी.

**मा.महापौर** :- ठिक आहे.

**श्री. बंडु प्रधान** :- पाने क्र.१७ मध्ये झोपडपट्टी सुधारणा व देखभाल दुरुस्तीसाठी १०.०० लाख आहे. त्या ऐवजी रु ३० लाख करण्यात यावा.

**मा. आयुक्त** :- आपणास तरतुदीत काही खर्चात वाढविण्याची असेल तर कोणत्या ठिकाणी कमी करावयाची तेही सांगावे लागेल एकतर उत्पन्नात तरी वाढ दाखवावी लागेल नाहीतर दिलेल्या खर्चामध्ये काही खर्च कमी करुन आपण म्हणता त्या खर्चावर तरतुद करावी लागेल या दोन्हीही सांगड करणे आवश्यक आहे.

**मा. महापौर** :- कमी जास्त करता येईल ते पुढे इमारत मधुन गरज भासल्यास करता येईल.

**श्री. प्रकाश जावळे** :- रुपये १०.०० लाखाची शिल्लक तरतुद करावी.

**श्री. बंडु प्रधान** :- स्लम साठी १ करोड मागील वर्षी तरतुद होती ती या वर्षी ४० ते ५० लाख कमी का करण्यात आली.

**मा. महापौर** :- ईमारत दुरुस्ती मधुन १५.०० लाख आहेत त्या ऐवजी १२.५० लाख ठेवु त्यात झोपडपट्टी सुधारणासाठी खर्च होईल म्हणजे २.५० लाख कमी करण्यात येईल.

**श्री. नामदेव मानकापे** :- पान क्र. १७ मध्ये बालवाडी साठी वाढीव तरतुद ठेवावी. माझ्या वार्डात अद्यापही बालवाडी सरु नाही त्या ठिकाणी सुरु करण्यात यावी.

**मा. महापौर** :- ठिक आहे.

**श्री. मोतीराम घडामोडे** :- पान क्र.१८ मध्ये खेळाचे साहित्यासाठी ५० हजाराची तरतुद आहे तर ५.०० लाखाची तरतुद व्हावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- १ लाखची तरतुद ठेवावी.

**मा. महापौर** :- पान क्र.१७ वरील शाळेतील बागेसाठी ५.०० लाखाची दुरुस्ती करण्यात येते.

**श्री. मोतीराम घडामोडे** :- पान क्र.१८ बाबत ५० हजाराची तरतुद शाळेच्या संदर्भात केलेली आहे.तो अपुरी असुन तीत रु ५.०० लाखाची वाढ करण्यात यावी ज्यामुळे शाळेची कंपाऊड वॉल व दुरुस्ती करणे शक्य होईल कारण महापालिकेककडे शाळा जास्तीच्या असल्याने ही तरतुद अपुरी पडणार आहे. तेंव्हा इंधन ,टेलिफोन व दुरुस्ती खर्चाची ६८ लाखाची तरतुद रद्द

करुन तो खर्च यावर करण्यात यावा अंदाजे ५०.०० लाखाची बचत महापालिकेने करावी शाळेच्या बाबतीत वाढीत तरतुद करावी.

**मा. महापौर** :- तसे करता येणे शक्य नाही आपआपल्या वार्डातील स. सदस्यांनी स्वेच्छा निधितुन या बाबतचा खर्च करावा.

**श्री. मोतीराम घडामोडे** :- जर तरतुदीने वाढ करीत नसल्यास मी निषेध म्हणुन सभात्याग करीत आहे.(वेळ २.२५ वाजता)

**सौ. लता दलाल** :- पान क्र.१९ सार्वजनिक बाबा मध्ये उद्याने व उद्याने नविकरण असा आहे आणि यासाठी ३३०० ची तरतुद केलेली आहे.ती याची कशी माहिती द्यावी.

**मा. महापौर** :- एकत्रिकरण करण्यात आलेले आहे.

**मुख्य लेखा परिक्षक** :- या ठरावात दर्शविल्या प्रमाणे वर रु १० लाख भांडवली अंदाज पत्रकातील आहेत आणि खाली ३० लाख दाखविलेले आहेत ते शासकिय अनुदानात नविन उद्याने तयार होणार त्याच्या मधील आहेत.

**सौ. लता दलाल** :- शासकिय अनुदानातुन व महापलिकेतुन प्रत्येकी खर्च किती होणार याची सविस्तर माहिती द्यावी.

**मा. आयुक्त** :- सार्वजनिक बाबा या विभागा अंतर्गत वेतनासाठी रु २३.०० लाखाची तरतुद आहे. बागा मशागत आणि बागे मधचा खेळाच्या साहित्याची खरेदी व दुरुस्ती रु १०.०० लाखाची असे मिळुन ३३.०० लाखाची आहे.

**श्री. बंडु प्रधान** :- पान क्र.२० बाबत सावित्रीबाई फुले दत्तक योजने बाबत रु १० हजार रु २०.०० हजार करण्यात यावी.

**मा. आयुक्त** :- सावित्रीबाई फुले विद्यार्थी सहा योजने मध्ये दहा हजाराची तरतुद आहे ती योजना मंजुर करण्यात आलेली आहे त्याच्यातील १०.०० लाखाची अपेक्षित आहे. ते फिक्स डिपॉझीट ठेवुन ते व्याज येणार त्यावर ती योजना आहे. शिवाय मानधनातुन स. सदस्यांची समिती असेल तर या योजनेसाठी कपात करण्यात येईल.

**श्री. रतनकुमार पंडागळे** :- पान क्र.२१ मध्ये पाहूनचार भत्ता महापौरांचा आहे तो ५० हजारावरुन १.०० लाख करावा व मा. आयुक्तांचा ५ हजारा वरुन १.०० लाख करावा.

**मा. आयुक्त** :- नियम प्रमाणे आयुक्तांना ५ हजारच असावा.

**मा. महापौर** :- महापौरांचा पाहुणचार भत्ता मंजुर

**श्री. अलफखान** :- पान क्र.२२ मध्ये ३६ मधील शहर सर्व्हेक्षण सिटी सर्व्हे बाबत रु २०.०० लाख ठेवलेले आहेत तर माझी सुचना आहे की, या वर्षी हा खर्च होणार नाहीत कारण सन १९७१ मध्ये पाच वर्षात शहर सिटी सर्व्हे झालेला होता त्यावेळी आम्ही रुपये ३.०० लाख भरणा केलेला होता परंतु आता १९९३-९४ साठी २०.०० ऐवजी रु ५.०० लाखाची तरतुद ठेवावी व उरलेले रुपये १५.०० स. नगर सेवक यांच्या सुचने नुसार कार्यवाही करावी.

**मा. आयुक्त** :- स. सदस्यांनी शहर सर्व्हेक्षण सिटी सर्व्हे साठी करण्यात आलेल्या तरतुदीत बाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे. या संबंधात शासनाकडुन ६०.०० लाख रुपये सिटी सर्व्हेसाठी ताबडतोब डिपॉझीट करावेत अशा प्रकारच्या शासनाच्या सुचना आलेल्या आहेत या संबंधात संबंधित आधिका-यांशी आम्ही चर्चा केली आणि त्यांना सांगीतले की, महापालिकेची रु ६० लाख रक्कम एकदम भरण्याची स्थिती नाही तेंव्हा आम्ही तुम्हाला तिने वर्षात रु

२०.०० लाख या प्रमाणे हे रु ६०.०० लाख भरु आणि त्या प्रमाणे सिटी सर्व्हेचे काम सुरु करावे परंतु सिटी सर्व्हेकउे काही रक्कम डिपॉझीट करीत नाहीत तो पर्यन्त प्रत्यक्षात काम सुरु होणार नाही म्हणुन रु.२०.०० लाख शहर सिटी सर्व्हेसाठी भरु व कामाला प्रारंभ करु या त्यांच्या पुढील वर्षी जसे आपल्याकडे पैसे असतील तसे शासनाकडे पैसे वर्ग करण्यात येतील परंतु ही तरतुद आपल्याला हवी असेल तर रुपये १०.०० लाखाची किंवा २०.०० लाखाची ठेवता येईल . तरीही शासनाचे असे म्हणने आहे की, कमीत कमी तीन वर्षातील रुपये २०.०० लाखाचा १ला हप्ता भरल्या शिवाय आम्ही कामास सुरुवात करणार नाही.

**श्री. धनंजय गंगाखेडेकर** :- विद्युत मंडळाकडुन प्रत्यक पोलवर भाडे आकारण्या संबंधि आपण निर्णय घेतलेला होता त्या बाबत काय कार्यवाही झाली याची माहिती द्यावी व तशी बजेट मध्ये नोंद घेतलेली आहे काय ?

**मा. आयुक्त** :- विद्युत मंडळाला या संबंधिचा पत्र व्यवहार आम्ही केलेला आहे परंतु त्यांनी असे म्हटलेले आहे की, शहरात जे पोल लावले जातात ते शहराच्याच सुविधासाठी लावले जातात असे त्यांचे म्हणने आहे. आणि याबाबत विद्युत मंडळाकडील काही कायद्याचे नियम व अटी आहेत त्या दाखविलेल्या आहेत या संबंधी पैसे भरण्याची काही आवश्यकता नाही. तमच्या मागणीवरुन व गरजेनुसार आम्ही शहरात पोल देतो त्यामुळे भाडे देता येणार नाही तरीही वरिष्ट पातळीवर पुन्हा तपासुन घेण्यास येत साआहे. अजुन अंतिम निर्णय झ ाालेला नाही. त्यामुळे अंदाजत्रकात तशी तरतुद केलेली नाही.

**श्री. स.अहमद स.हुसैन** :- विद्युत मंडळा मार्फत जे काही नविन खांब शहरात लावले जातात (उदा जालना रोडवरील विद्युत खांब) व जुने विद्युत खांब विद्युत मंडळ स्वत: च्या कार्यालयात जमा करतात. त्या ऐवजी जुने खांब सर्वमहापालिकेच्या भांडार मध्ये जमा व्हावेत व जस जसे नविन ठिकाणी मागणी येईल तसतशी वाटप करण्यात यावे.

**मा. महापौर** :- स. सदस्यांनी सुचित केलेली मागणी योग्य आहे.

**श्री. रतनकुमार पंडागळे**

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- पान क्र.२२ मध्ये चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या बाबातीत वर्षातुन एकदा ड्रेस मिळतो परंतु वर्षातुन दोन ड्रेस मिळण्यासाठी आवश्यक ती तरतुद करावी.

**मा. महापौर** :- या बाबत एक बायलॉज तयार करुन कार्यवाही करता येईल.

**मा.आयुक्त** :- गणवेशाच्या बाबतीत महापालिकेमध्ये गणवेशाचे अधिनियम तयार केलेले नाहीत ते करणे आवश्यक आहे काणत्या कमेचा-यांला कोणत्या रंगाचा ड्रेस असावा याचीही अधिनियमात नियमावली पाहिजे. सामान्यपणे एक किंवा दोन ड्रेस वर्षातुन द्यावा या विषयी सभागृहाचे धोरण ठरणे आवश्यक आहे म्हणजे नियमाप्रमाणे तरतुद कमी जास्त करता येईल सध्याचा जे गणवेश वाटपाचे प्रमाणनुसार तरतुद आहे.

**मा. महापौर** :- मागील वर्षी रु ८.०० लाखाची तरतुद गणवेश संदर्भात होती तीत रु ५० हजाराची वाढ करण्यात आलेली आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- वर्षातुन दोनदा गणवेश वाटप करणेसाठी रु.१०.०० लाखाची तरतुद करावी.

**मा. महापौर** : गणवेशासाठी रु. ९.०० लाखाची तरतुद करण्यात येते.

**श्री. बंडु प्रधान** :- सानुगृह अनुदान रु ४०.०० लाखाची तरतुद केलेली आहे तेंव्हा तीत वाढ करण्यात यावी.

**मा.आयुक्त** :- मागील वर्षी रु.४१.०० लाखाची तरतुद सानुगृह अनुदानाची होती आता ती रु.४०.०० लाखाची आहे, कारण त्या पगाराच्या स्लॅब मधुन ते कर्मचारी कमी कमी होतात. आणि पगार सारखे वाढतात त्यामुळे तरतुद कमी इ ाालेली बरोबर आहे असे आम्हाला वाटते.

**श्री. रतनकुमार पंडागळे** :- इतर मनपा स्वबळावर तरतुद करुन कार्यवाही करतात तर आपण शासनाचा आधार घेतो ते बरोबर नाही म्हणुन रु २५००/- ची अट रद्द करावी.

**मा. आयुक्त** :- सानुगृह अनुदानामध्ये या ठिकाणी रु.४०.०० लाखाची तरतुद असली तरी पाणी पुरवठा व जलानि:सारण कर्मचाऱ्यांचे सानुगृह अनुदान त्या बजेटमध्ये आलेले आहे त्यामुळे केलेली तरतुद बरोबर आहे.

**श्री. रतनकुमार पंडागळे** :- पान क्र.२३ मध्ये नोकरांना घर बांधणी अग्रीम मागील दोन वर्षापासून रु २५.०० लाख आहे ती अपुरी पडते त्यामुळे बऱ्याचशा कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ होत नाही तेंव्हा वाढ करुन रुपये ३५.०० लाख करण्यात यावी.

**मा. महापौर** :- कर्मचारी वाहन खरेदी योग्य पध्दतीने करीत नाही. त्यापेक्षा इतर फर्निचर खरेदी करण्यासाठी महापालिकेने कार्यवाही करावी.

**श्री. शांताराम काळे** :- कर्मचाऱ्यांना वाहन खरेदी अग्रीम मंजुर करीत असतांना त्यांना महानगरपालिकेने गॅरटी घेणे आवश्यक आहे. ज्यामुळे कर्मचारी परतफेड व्यवस्थीत करु शकतील. कर्मचाऱ्यांची कपात पगारातुन करण्यात यावी.

**श्री. रतनकुमार पंडागळे**:- पान क्र.२३ मध्ये कर्मचाऱ्यांना सणा निमिताला रु ६०००/- अग्रीम मिळणार याची या बजेटमध्ये नोंद व्हावी.

**मा. आयुक्त** :- शासनाचे सना निमित्ताने वाटप करण्यात येणाऱ्या अग्रीमांचे संदर्भात आदेश आलेले आहेत की, रु ६००/- अग्रीम कर्मचाऱ्यांना देण्यात यावे आणि हे अग्रीम एप्रिल ९३ पासुन मान्य केलेले आहे त्यामुळे यात रु १०.०० लाख ऐवजी रु १५.०० लाख तरतुद करणे आवश्यक आहे.

**श्री. बंडु प्रधान** :- पान क्र.२४ मध्ये झोपडपट्टी सुधारणा मध्ये रु १ कोटी वरुन रु.६०.००लाखावर तरतुद केलेली आहे ते अल्पशी असुन स्लम भागातील कामे होत नाहीत.

**मा. आयुक्त** :- झोपडपट्टी विकासावर भांडवली तरतुदीतुन व शासनाचे विशेष अनुदानातुन एकुण रु.१.१९ लाखाची तरतुद केलेली आहे म्हणुन येथे पर्वी १ कोटी व आता रु.६०.०० लाख दाखविलेले आहे. याचे कॉम्पेनसेशन शासनाचे अनुदानात आधिक घेतलेली सआहे त्यामुळे एकुण योजना रु.१.१९ लाखाची आहे. त्यामुळे तरतुद कमी केलेली नाही. फक्त त्याचे दोन भागात विभागणी केलेली आहे.

**श्री. बंडु प्रधान** :- विशेष कमकुवत घटकासाठी ५% प्रमाणे ३५ लाख रुपये शासनाचे वेगळे होते.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- मागील वर्षी रु.१ कोटी होते ते आता रु १९ लाखानी वाढलेले आहे.

**मा. महापौर** :- कमकुवत घटकातील रु.३५ लाख मिळुन रु.१.५४ लाख होतात.महानगरपालिकांमध्ये ५% ऐवजी १५% एकुण तरतुदीच्या रक्कमेतुन खर्च करण्याचे आहे. त्याप्रमाणे मागील वर्षी या ठिकाणी एकुण रक्कतेच्या

१५% रक्कम झोपडपट्टी विकासासाठी खर्च करण्याची बजेट मध्ये तरतुद केलेली आहे होती त्याच पध्दतीची तरतुद या वर्षीही असावी अशी माझी मागणी आहे या बाबत ठराव पास झालेला आहे.

**श्री. बंडु प्रधान**

**श्री. प्रकाश जावळे** :- इतर महानगर पालिका मध्ये ५% ऐवजी १५% एकुण तरतुदीच्या रक्कमेतुन खर्च करण्याचे आहे. त्या प्रमाणे मागील वर्षी या ठिकाणी एकुण रक्कमेच्या १५% रक्कम झोपडपट्टी विकासाठी खर्च करण्याची बजटमध्ये तरतुद केलेली होती. त्याच पध्दतीची तरतुद या वर्षीही असावी अशी माझी मागणी आहे या बाबत ठराव पास झालेला आहे.

**मा.महापौर** :- ठिक आहे. आपल्या सुचने नुसार १५% चा ठराव पास झाल्याप्रमाणे शासनाकडुन मंजुर होऊन आल्या नंतर तीन वाढ करण्याची तरतुद केल्या जाईल याची नोंद घ्यावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- पान क्र.२५ मध्ये स्टेडियमसाठी जी तरतुद केली आहे ती आपुरी आहे त्यात वाढ करावी.

**श्री. नरेंद्र पाटील** :- पोहण्याच्या तलावासाठी या ठिकाणी रु.८.०० लाखाची तरतुद आहे. मागील वर्षीही हीच तरतुद केलेली होती . तेव्हा मागील वर्षी काय काम केले याची माहिती द्यावी आणि किती वर्ष ती केस चालेल यामध्ये महापालिकेचे वकीलच विरोधी वकिलांना जाऊन माहिती देतात ही बाब चांगली नाही.

**मा. महापौर** :- कोर्ट प्रकरण चालु असल्याने काम बंद होते त्यामुळे तरतुद करण्यात आलेली रक्कम खर्च झालेली नाही.

**श्री. शांताराम काळे** :- पोहण्याच्या तलावा बाबत गेली ४.५ वर्ष चर्चा चालु आहे. यामध्ये संबंधित अधिकाऱ्याला कोणताही अधिकार नसल्याने व वेळीवेळी त्यांचे अधिकार काढुन घेतल्याने या कामामध्ये दिंगाई झालेली आहे. तेंव्हा पुन्हा ासंबंधित अधिकाऱ्यांना हे अधिकार द्यावेत व त्यांचे कडुन लिहुन घ्यावे की हे काम इतक्या दिवसांत पुर्ण करण्यात येईल. अन्यथा निलंबीत करण्यात येईल.

**श्री. नरेंद्र पाटील** :- गेल्या चार पाच वर्षापासून या संबंधात एकच उत्तर मिळते त्यामुळे यावर काहीतरी तोडगा काढणे आवश्यक आहे.

**मा. महापौर** :- स. सदस्य. श्री. शांताराम काळे यांना सुचित केल्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**श्री. नरेंद्र पाटील** :- महिला प्रसाधनासाठी रु.२.०० लाखाची तरतुद केलेली आहे तर पुरुषांच्या प्रसाधनासाठी काहीही तरतुद केलेली नाही. तेंव्हा रु.२.०० लाखाची तरतुद करावी.

**सौ. लता दलाल** :- गेल्या वर्षी शहरात महिला प्रसाधन गृहासाठी रु.५.०० लाखाची तरतुद केली असतांनाही कुठलाही खर्च या ठिकाणी करण्यात आलेला नाही. किंवा प्रसाध गृह बांधण्यात आलेले नाही आणि या वर्षी तर महिला प्रसाधनासाठी आणखी रु.३.००लाख कमीची तरतुद केली आहे. ही बाब गंभिर आहे तर महापाहिलकेतील महिला कर्मचाऱ्यांना प्रसाधन बांधणची मागणी करुनही ते सुध्दा त्यातुन झालेल नाही याबाबत निषेध करावेसे वाटते (या वेळी सभागृहात शेम शेम असा आवाज) कमी करण्यात आलेली तरतुदीत वाढकरुन रु.५.०० लाख करण्यात यावे, जेणे करुन आगामी वर्षात ३०% महिला या ठिकाणी लोकप्रतिनिधि म्हणुन येतील तेंव्हा पुर्वीचे प्रसाधन गृहे

बांधण्याची कार्यवाही करावी व शहरात निरनिराळया ठिकाणी मी जागा दाखविण्याचे सहकार्य करीन.

**मा. महापौर** :- रु.२.०० लाखाची जी तरतुद केलेली आहे कार्यालयातील महिला प्रसाधनासाठी केलेली जागे अभावी कुठेही बांधकामे झालेली नाही. जर जागा उपलब्ध करुन दिल्यास इमारत निधीतुन कार्यवाही करण्यात येईल.

**सौ. लता दलाल** :- महिला प्रसाधन गृहे शहरात विविध ठिकाणी बांधण्यासाठी स्वतंत्र अशी तरतुद करण्यात यावी अशी आगृहाची विनंती आहे.

**मा.महापौर** :- ठिक आहे. स. सदस्यांची सुचना केल्याप्रमाणे इमारत निधितुन शहरातील महिला प्रसाधन गृहे बांधण्यासाठी रु.५.०० लाख खर्च करण्याची तरतुद करण्यात येते.

**श्री. नरेंद्र पाटील** :- सन १९८८ साली स्टेडियमसाठी रु.१० लाखाची तरतुद केलेली होती, तरीही गेंल्या पाच वर्षात कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. दरवर्षी १.०० लाखाची तरतुद यासाठी होते आणि स्टेडियम रु.२.०० कोटीचे होणार आहे तर यासाठी अजुन किती वर्ष लागतील.

**मा. महापौर** :- मा आयुक्त माहिती देतील.

**मा. आयुक्त** :- स्टेडियम बाबत गेल्या वर्षी जी तरतुद केलेली होती ती खर्च झालेली नाही. हा स्टेडियम शहरात फार मोठा होणार आहे या स्टेडियमसाठी टेंडर कॉल केलेले होते आणि डिझाईन टेंडर नुसार हा प्रकल्प रु.१.०० कोटीचा होणार आहे. डिझाईनसह टेंडर विविध गुत्तेदार व इंजिनिअरनी भरलेला आहेत. हा १.०० कोटीचा प्रकल्प तयार करणेसाठी महानगरपालिकेच्या खर्चातुन करता येणे शक्य नाही. कारण आपल्या बजेटवर फार मोठा ताण पडेल या साठी महानगरपालिकेला कोणत्या तरी ठिकाणा वरुन लमसम कर्ज काठावे लागेल. असा एक विचार आलेला होता, त्यामुळे या कामात आधिक प्रगती झ ालेली नाही. स.सभागृहाने याचा विचार केल्यास एकतर स्वंतत्र कर्ज उभारुन स्टेडियम तयार करावयाचा का ?किंवा या प्रकल्पास मंजुरी देवुन वर्षी १० किंवा २० लाखाच्या टप्पाने पाच वर्षात स्टडियम पुर्ण करावा का ? अशा प्रकारचा धोरनात्मक निर्णय सभागृहात घ्यावा लागेल . त्याच्या शिवाय या स्टेडियमच्या कामाची प्रगती करता येणे शक्य नाही. प्रशासनाने सदरील स्टेडियम मागे ठेवण्याचे जे कारण आहे ते स्टेडियम सिडको मध्ये असल्याने सिडको हा औरंगाबाद शहराचाच भाग आहे परंतु शहरातील खेळाडु सिडकोकडे खेळावयास जाण्यास फरसी तयारी दर्शवित नाही. तेंव्हा ऐवढा मोठा खर्च महानगरपालिकेने तातडीने करावयाचा काय ? या संबंधिचा धोरणत्मक निर्णय करणे आवश्यक आहे की, एवढा निधी आपण कसा उभारणार व किती वर्षात हे काम पुर्ण करणार याचा निर्णय घेतल्यानंतरच पुढील कार्यवाही होईल.सध्याची जी तरतुद छठेवलेली आहे ती धरुन तरतुद रु.१.०० लाखाची आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग** :- सिडको मध्ये एवढा मोठा खर्च करण्यापेक्षा आमखास मैदान जे आहे त्या ठिकाणी जागा काही डिसपुट असल्यास त्यावर तोडगा काढुण एक मिनी स्टेडियमची योजना आखता येऊ शकते.

**मा.महापौर** :- या आमखास मैदानाची जागा पुर्णपणे नाही. त्यामुळे सिडको कडील जागा निवडण्यात आली आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- सिडको भागातील ३६ एकर जागा स्टेडियमसाठी राखुन ठेवण्यात आलेली आहे आणि त्या साठी मागील वर्षी रुपये.१.०० लाखाची तरतुद केली असती तर ३० ते ३५ लाखाचे काम झाले असते यासाठी या वर्षी ठेवण्यात आलेली रु.१०.०० लाखाची तरतुद वाढवुन ती रु.१०.०० लाख करावी व संबंधित अधिकाऱ्यांना ताबडतोब टेंडर काढुन कामास जलद गतीने सुरु करण्यास सुचना द्याण्यात कारण १.०० कोटीचे कर्ज घेण्याबाबत येत्या सर्वसाधरण सभेत पॉलिसी डिसाईड करण्यात येईल.

**श्री. नरेंद्र पाटील** :- सिडकोतील बरेचसे खेळाडु विद्यापिठ ग्राऊंडवर जातात. तेंव्हा लांब व जवळचा प्रश्न नसुन स्टेडियम तयार होण्याचा प्रश्न आहे. तेंव्हा स. सदस्य. श्री.जैस्वाल यांची सुचित केल्या प्रमाणे रु.१०.०० लाखाची तरतुद करावी.

**मा.महापौर** :- ठिक आहे. परंतु कशातुन करावी ते आपण सुचीत करावी.

**श्री. चेतनकरण संचेती** :- सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागातुन ५०% अनुदान मिळने त्यासाठी कसे प्रयन्त करता येती त्याबाबत प्रशासनाने करावे.

**श्री. शांताराम काळे** :- शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता व नागरिकांच्या दृष्टीने विविध विकास कार्य करुन नक्षत्रवाडी ही गावे विकसित होण्याच्या मार्गावर आहेत.

**श्री. बंडु प्रधान** :- स. सदस्यांच्या स्वेच्छानिधितुन काही निधी उपलब्ध झाल्यास ते करावे. म्हणजे १८.०० लाख शिल्लक उरण्याची शक्यता आहे.

**श्री. प्रदिप जैस्वाल**

**श्री. नरेंद्र पाटील** :- आम्हाला रु.१०.०० लाखाची तरतुद स्टेडियमसाठी पाहिजे ते कसे करावे प्रशासनाने करावे. किंवा सृ सदस्यांच्या स्वेच्छा निधितुन उरत असल्यास तसे करावे.

**मा.महापौर** :- ठिक आहे. तसे करावे.

**श्री. प्रदिप जैस्वाल** : छत्रपती शिवाजी महाराज व मौलाना अब्दुल कलाम आझाद संशोधन केंद्रासाठी मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी रु.५.०० लाखाची तरतुद करावी. व कामास सुरुवात व्हावी.

**श्री. बंडु प्रधान** :- डॉ. आंबेडकर रिसर्च सेंटर साठी रु.२५.०० लाख शासन व केंद्र शासनाकडुन मिळाले व त्यात मनपाने तरतुद केली त्याप्रमाणे काम होते आहे. परंतु ती अपुरी असुन पुन्हा वाढ करुन त्वरीत कामास सुरुवात करावी.

**आयुक्त** : डॉ. आंबेडकर रिसर्च सेंटर साठी मनपाने रु. १२.५० व शासनाने १२.५० लाखाची मदत केली आहे एकुण २५.०० लाखाचा हा प्रकार आहे.

**सौ. लता दलाल** : नाला ट्रेडिंगसाठी रु. ५.०० लाखाची तरतुद केलेली आहे.

**मा. महापौर** : मागील वर्षीही रु. ५.०० लाखाची तरतुद दोन्हीही संशोधन केंद्रासाठी तरतुद करण्यात आलेली होती परंतु ती खर्च झालेली नाही. म्हणजे तरतुद करुन काहीही अर्थ नाही.

**मा. आयुक्त** :- या ठिकाणी ज्या तरतुदी छत्रपती शिवाजी महाराज व मौलाना अब्दुल कलाम आझाद या दोन्हीही संशोधन केंद्रासाठी गेल्या दोन वर्षापासून रु.५.०० लाखाची तरतुद करण्यात आलेली होती तथापी आतापर्यन्त जागे अभावी खर्च करण्यात आलेला नाही.तेंव्हा वर्षानी कमी करुन म्हणुन १.०० लाखाची तरतुद केली आहे. जर जागा उपलब्ध करुन दिल्यास पुन्हा बजेट रिव्हाईज्ड करुन तरतुदीतुन वाढ करण्यात येईल.

**श्री. मुजिब आलमशा खान** :- जागे संदर्भात केंद्रासाठी माझ्याकडे एक एकर जागा होती ती घेऊन करावयास पाहिजे होती तशी केलेली नाही केवळ या संशोधन केंद्रासाठी माझेककडील जागा घेऊन कार्यवाही करावी.

**श्री. प्रदिप जैस्वाल** :- तरतुद करुनही संबधित अधिकाऱ्यांनी जागेची पाहणी करुन कामास सुरुवात केली नाही. याबाबत प्रशासन दोर्षी आहे.

**मा.महापौर** :- मग आपण वर्षभर का बोलला नाहित. आताच का बोलता आहात. तरतुद केल्यानंतर जागेचीह पाहणी करुन संबधित अधिकाऱ्यांमार्फत कामास प्रारंभ ाकराता आला असता.

**श्री. अजिजुल्ला बेग** :- सन १९९१-९२ मध्ये डॉ. आंबेडकर संशोधन केंद्रासाठी रु.१२.५० लाख व छत्रपती शिवाजी महाराज, मौलाना अब्दुल कलाम आझाद या संशोध केंद्रासाठी रु.५.०० लाखाची तरतुद शासनाचे अनुदानातुन केलेली होती. व मनपातर्फे १.०० लाखाची तरतुद होती. तेंव्हा शासनाकडील अनुदानाचा खर्च कुठे केला याची माहिती द्यावी.

**मा. महापौर** :- आता मा. महापौर यांनी संचीत केल्याप्रमाणे दोन्हीही संशोधन केंद्रासाठी रु.५.०० लाखाची तरतुद केलेली होती परंतु जागे अभावी खर्च झालेली नाही. तेंव्हा १.०० लाख ठेवलेली तरतुद पुन्हा काम सुरु झाल्यास वाढविता येईल.

**मा. आयुक्त** :- आपल्याकडे छत्रपती शिवाजी महाराज व मौलाना अब्दुल कलाम आझाद या दोन संशोधन केंद्रांना शासकीय अनुदान मिळालेले नाहीत. शासकिय अनुदानसाठी तरतुद करता येते. परंतु शासकिय अनुदान मिळालेले नाहीत.

**सौ. लता दलाल** :- नाला ट्रेडिंगसाठी अंजली टॉकिजाच्या समोरील भागापासून सर्मथनगर, कबाडीपुरा, धनआईस फॅक्टरी भागापर्यन्त रु.६०.०० लाख दाखविलेले आहे त्या खर्चाची माहिती द्यावी व पुन्हा ५.०० लाखाची तरतुद कोणत्या कामासाठी आहे याबाबत माहिती द्यावी.

**मा.महापौर** :- ही तरतुद इन जनरल आहे स्पेसिफीक असे नाही.

**अलफखान** : पान क्र. ३६ व ३७ मध्ये जलनि:सारण लाभकर मध्ये जी तरतुद दाखविलेली १% प्रमाणे ६.५० लाख नफा होतो त्याप्रमाणे वाढ करण्यात यावी अशी दुरुस्ती व्हावी.

**मा. महापौर** : ठिक आहे.अशी दुरस्ती व्हावी.

**श्री. अलफखान** :- अनु.क्र.५ मध्ये (स्थायी समितीच्या निवेदनानंतर) मा. आयुक्तांच्या निवेदनावर शासनाकडील डेपुटेशनवर कर्मचारी अधिकारी येतात त्यांचेसाठी सन १९९३ मध्ये १.१० लाख रु. ठवले व आता १९९३-९४ मध्ये ११.०० लाख केलेले आहे. तेंव्हा ११.०० लाख योग्य की १.१० लाख योग्य याची माहिती द्यावी व याची दुरुस्ती व्हावी.

**मा.महापौर** :- ठिक आहे. त्याचप्रमाणे महापौर कक्षाकडे एक नविन जीप वेळोवेळी लागते यासाठी रु.२.५० लाखाची तरतुद करण्यात येते.

**श्री. अविनाश कुमावत** :- शहर अभियंता यांना मननामध्ये १ मे ९३ पर्यन्त मुदत वाढ दिलेली आहे.

**मा.महापौर** :- ही बजेट विषयी बैठक असल्याने यावर चर्चा होऊ नये. फक्त प्रस्ताव मा. आयुक्त यांचे अभिनंदन करणारा प्रस्ताव मांडलेला आहे. त्यावर (यावेळी सभागृहात सर्व सदस्यांनी मंजुर म्हणुन होकार दिला.

**ठराव** :- प्रस्तावात दर्शविण्ल्याप्रमाणे सन १९९२-९३ चे मुळ अंदाजपत्रक व सन १९९३-९४ चे सुधारित अंदाज पत्रकामध्ये खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात येते.

| अनु क्र. | अंदाजपत्रक पान क्र. | कोणत्या हेडमधुन/कामसाठी | किती वाढ/कमी |
|---|---|---|---|
| १. | १. | अग्निशामन कर | ४.०० लाख वाढ |
| २. | ४. | शिक्षण कर | ०.४३ लाख वाढ |
| ३. | ८. | रस्ता कर | ९.७५ लाख कमी |
| ४. | १३ | औषधी खरेदी | १०.०० हजार वाढ |
| ५. | १४. | औषधी खरेदी | १.७५ लाख वाढ |
| ६. | १६. | कोंडवाडा चराई | २०.०० हजार वाढ |
| ७. | १७. | झोपडपट्टी सुधारणा दुरुस्ती | २.५० लाख वाढ |
| ८. | १७ | इमारती दुरुस्ती व देखभाल | २.५० लाख वाढ |
| ९. | १८ | मनपा शाळेस खेळाचे साहित्य पुरविणे | ५०.००हजार वाढ |
| १०. | १९ | विविध क्रिडा स्पर्धा एकत्रीत | १.५० लाख वाढ |
| ११. | २१. | महापौराचा पाहुणचार भत्ता | ५० हजार वाढ |
| १२. | २२ | शहर सर्वेक्षण | १०.०० लाख कमी |
| १३. | २२. | कर्मचारी गणवेश बाबत | ५०.०० हजार वाढ |
| १४. | २३. | घर बांधणी अग्रीम | ५ लाख वाढ |
| १५. | २३. | उत्सव अग्रीम | ५ लाख वाढ |
| १६. | २४. | इमारती व उर्वरित कामे | ३ लाख वाढ |
| १७. | २४. | महिला प्रसाधन | ३ लाख वाढ |
| १८. | २५. | मा.सभासंदांचा स्वेच्छा निधी | १८ लाख कमी |
| १९. | २५. | सिडको स्टेडियमसाठी | ९ लाख वाढ |
| २०. | २८. | वाहतुक नगर | १३.६३ लाख वाढ |
| २१. | ३६. | पाणिपुरवठा लाभ कर १%प्रमाणे | ६.५० लाख वाढ |
| २२. | ३७. | जलनिःसारण लाभकर१%प्रमाणे | ६.५० लाख वाढ |
| २३. | | (दुरुस्ती) | ९.९० लाख कमी |
| २४. | | नविन वाहन खरेदी | २.५० लाख वाढ |
| २५. | | जाहिरात कर | २.०० लाख वाढ |

या व इतर दुरुस्त्यासह सन १९९२-९३ चे मुळ अंदाजपत्रक व सन १९९३-९४ चे सुधारीत अंदाजपत्रकास या व इतर दुरुस्त्यासह सर्वानुमने मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही बाकी.

# "*ऐनवेळचा प्रस्ताव*"

**विषय क्र.१४१/२. :-** महानगरपालिकेचे विद्यमान आयुक्त डॉ. गोंविद गारे हे उत्कृष्ट साहित्यीक आहेत. त्यांना यावर्षी उत्कृष्ट साहित्य निर्मितीचा राज्य शासनाचा बालकांसाठी "गोड गाणी" या पुस्तकर प्राप्त झाले आहे. पुर्वी ही राज्य शासनाकडुन वाडमय निर्मितीसाठी तीन पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्याचा या सर्वसाधारण सभेत अभिनंदनाचा ठराव मंजुर करण्यात यावा.

**सुचक :-** श्री. रतनकुमार पंडागळे

**अनुमोदक :-** श्री. डॉ. शांताराम काळे, श्री. प्रदिप जैस्वाल,
श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री. प्रदिपकुमार एस.दत्त.

**ठराव क्र. १४१/२ :-** ऐनवेळी सभागृहात मांडलेल्या प्रस्तावानुसार महानगरपालिकेचे विद्यमान आयुक्त डॉ. गोविंद गारे हे उत्कृष्ठ साहित्यीक असून त्यांना या वर्षी उत्कृष्ठ साहित्य निर्मितीचा राज्य शासना ाचा बालकांसाठी "गोड गाणी" या पुस्तकासाठी पुरस्कार प्राप्त झ ााला आहे. या पुर्वीही राज्य शासनाकडुन वाडमय निर्मितीसाठी तीन पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्याबद्दल मा. आयुक्त डॉ. गोंविद गारे, महानगरपालिका औरंगाबाद यांचा अभिनंदनाचा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

जण गण मन राष्ट्रगिताने सभा संपली

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| सचिव | मा. महापौर |
| महानगरपालिका, औरंगाबाद | महानगरपालिका,औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

मंगळवार दिनांक २०.४.९३ रोजी अंदाजे ११.४० वाजता मा. महापौर श्री. यादव अशोक सायन्ना यांचे अध्यक्षतेखाली "वंदे मात्रम" या गिताने सर्वसाधरण सभेस सुरुवात झाली.

या सभेस मा. आयुक्त उपआयुक्त, तथा अधिकारी वर्ग आणि खालील प्रमाणे स. सदस्य उपस्थित होते.

१) मा. श्री. अजिमखान दादासिंग अ. रहेमान
२) मा. श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
३) मा. श्री. विधाते प्रभाकर सिताराम
४) मा. श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
५) मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
६) मा. श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
७) मा. श्री. सोनवणे केशव काशिनाथ
८) मा. श्री. भुगरे तुळशीराम छगन
९) मा. श्री. सुर्यवंशी महादेव पुंडलीक
१०) मा. श्री. पाटील नरेंद्र यादवराव
११) मा. श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
१२) मा. श्री. म. आयुब गुलाम जिलानी
१३) मा. श्री. मुजीब आलमशा खान
१४) मा. श्री. प्रधान बंडु गोविंदराव
१५) मा. श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१६) मा. श्री. तकीहसनखान कासीम हसन खान
१७) मा. श्री. स. अहमद एकबालुद्दीन स. मो. कुतुबुद्दीन
१८) मा. श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
१९) मा. श्री. ओक जयवंत केशवराव
२०) मा. श्री. गिल इगबालसिंग प्रितमसिंग
२१) मा. श्री. अ. रशिदखान (मामु) अ. हमीद खान
२२) सौ. दलाल लता श्रीनिवास
२३) मा.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२४) मा.श्री. हाजी मोहमंद हफिजोद्दीन
२५) मा. श्री. छापरवाल रमेश नारायण
२६) मा. श्री. पालिवाल विजय गोविंदलाल
२७) मा. श्री. इस्माईल अ. करीम
२८) मा. श्री. फैय्याजखान अहमदखान
२९) मा. श्री. अलिमबेग मिर्झा कलिम बेग
३०) मा. श्री. मोहसिन अहमद बशीर अहमद

३१) मा. श्री. मगर शंकर जिजाराम भिकाजी
३२) मा. श्री. मानकापे नामदेवराव शामराव
३३) मा. श्री. पैठणकर पांडुरंग भिकाजी
३४) मा. श्री. सुग्रीम हरलाल रिडलान
३५) मा.श्री. अलफखान हुसेनखान
३६) मा.श्री. वाघमारे सुदाम भानुदास
३७) मा. श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
३८) मा. श्री. थोरात किशोर गोविंदराव
३९) मा. श्री. शिंदे मधुकरराव माणिकराव
४०) मा. श्री. काळे शांताराम यशवंत
४१) मा. श्री. दत्त प्रदिपकुमार एस.
४२) मा. श्री. ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
४३) मा. श्री. बारवाल गजानन रामकिसन
४४) मा. श्री. गोडसे आनंद जगदिश
४५) मा. श्री. मोटे राधाकृष्ण तुळशीराम
४६) मा. श्री. जावळे प्रकाश शिवराम
४७) मा. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
४८) मा. श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
४९) मा. श्री. परदेशी सुभाष शिवलाल
५०) मा. श्री. नवपुते कचरु चंद्रभान

संवाद :-

**श्री. आविनाश कुमावत :-** मनपाचे नगरसेवक तथा खासदार श्री. मोरेश्वर सावे यांना आयोघ्या प्रकरणी अटक केल्यानुसार शासनाचा निषेध या ठिकाणी सभागृहात करण्यात यावा . व शासनाकडे पाठवावा.

**श्री. प्रदिप जैस्वाल :-** यास माझे अनुमादन आहे.

**श्री. नरेंद्र पाटील, श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :-** अशा प्रकारचा निषेध करुन सभागृहबाहेर जावे. आमचे काही म्हणने नाही.

**मा.महापौर :-** स. सदस्यांना सुचित करण्यात येते की, अशा प्रकारचा निषेध ठराव होऊच शकत नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल :-** पुणे,ठाणे व इतर महानगरपालिकेमध्ये ज्या ज्या ठिकाणी या प्रकरणी अटक काही नेत्यांना झाली त्या संदर्भात त्या त्या महापालिकेत निषेधाचा ठराव झालेला आहे.

**श्री. आविनाश कुमावत :-** आपण जर अटकेच्या निषेधार्थ सभागृहात निषेध ठराव सर्वसंमत्तीने ठेवीन नसाल तर आम्ही आपला "निषेध" व्यक्त करुन सभात्याग करतो. त्या बरोबरच सर्व सेना सदस्यांनी निषेध करीत घोषना देवुन सभात्याग केला. अंदाजे वेळ (११.४५)

**मा. महापौर :-** मनपाने शहर अभियंता यांची मुदत संपलेली असतांनाही त्यांना या कार्यलयात अजुनही का ठेवण्यात आले. यामुळे त्यांचा पगार कोण देणार याची माहिती द्यावी.

**श्री. रतनकुमार पंडागळे**

**श्री. तकीहसन खान :-** मनपाचे शहर अभियंता यांना मुदत वाढ देण्याचा प्रस्ताव आपल्याकडे स्वाक्षरी स्तव पाठविले असता आपण स्वाक्षरी केलेली नाही.(यावेळी सर्व सेना सदस्यांचा अंदाजे १२.४६ वा. सभागृहात प्रवेश)

**श्री. शांताराम काळे :-** महाराष्ट्र शासनाकडुन शहर अभियंता यांना मुदतवाढ देण्याची मंजुरी आलेली आहे. त्यानुसार त्यांना कार्यालयात ठेवण्यात यावे.

**मा. महापौर :-** शासनाकडुन जरी शहर अभियंता यांना या कार्यालयात काम करण्यासंबंधीची मुदतवाढ आलेली असेल तरीही त्यांना ठेवावयाचे किंवा नाही याचे अधिकार सभागृहाला आहेत.

**श्री. शांताराम काळे**

**श्री. नारायण फत्तेलष्कर :-** शहर अभियंता यांच्या बाबत शासनाकडुन जे मुदतवाढीचे पत्र आलेले असल त्याप्रमाणे जसेच्या तसे नियमाप्रमाणे कार्यवाही प्रस्ताव ठेवणे आवश्यक होते. आणि जर त्यांना या कार्यालयात काम करण्यास नको पाहिजे असेल तरीही नियमाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक होते.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :-** एखादा प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर तीन महिने पर्यन्त आपणास काहीही करता येणे शक्य नाही.

**मा. महापौर :-** स. सदस्य श्री. प्रदिप जैस्वाल यांनी या संदर्भात प्रस्ताव मांडलेल्या होता तत्पुर्वी प्रशासनाने शहर अभियंता यांची मुदत संपण्यापुर्वी योग्य ती कार्यवाही करुन मुळ विभागात पाठविणे आवश्यक होते.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय**

**श्री. तकिहसन खान :-** यापुर्वीचे शहर अभियंता यांचे बाबतीत प्रस्ताव आलेला होता व त्यांना तीन महिन्याची मुदतवाढ देण्यात आलेली होती.

**श्री. धनंजय गंगाखेडकर :-** शहर अभियंता यांना एक महिन्याची मुदतवाढ देणे संदर्भात शहर अभियंता यांनी विनंती केलेली आहे आणि त्यांचे मार्च अखरेची कामे पुर्ण होणे आवश्यक आहे. यासाठी त्यांनी मा. महापौर व मा. आयुक्त यांना निवेदन दिलेले आहे. त्यात ४९ स. नगरसेवकांच्या स्वाक्षरीसह अर्ज आहे.

**मा.महापौर :-** अशाप्रकारचा कोणताही अर्ज किंवा फाईल माझेकडे आलेली नाही. आणि अशा प्रकारचा अर्ज माझ्याकडे पाठविण्याची काहीही आवश्यकता नाही. अशी पध्दत अवलंबुन जर मनपाचे कामे होत असल्यास योग्य वाटप नाही.

**श्री. नरेंद्र पाटील :-** मा. महापौरांनी केलेल्या उदगाराशी मी सहमत आहे अशा प्रकारची पध्दत अवलंबुन जर कामे होत असतील तर ते योग्य वाटत नाही. कारण उद्या जर कोणतेही अधिकारी अशाच प्रकारे दहा नगरसेवकांना हाताशी धरुन प्रतिनियुक्तीवरील अधिकारी कामे करवुन घेतील. या बाबत सर्वानी विचार करणे आवश्यक आहे.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :-** माझ्या मते काही स. नगरसेवक सभागृहात एक बोलतील व स्वाक्षऱ्या करतील तर काही नगरसेवक सभागृहात बाहेर राहुनही स्वाक्षऱ्या करतात. व त्यांना त्या विषयी काहीही माहिती नसते. ते केवळ स्वाक्षऱ्या करण्याचे काम करतात. तेंव्हा योग्य ते विचार करुनच निर्णय घेणे आवश्यक आहे.

**श्री. बंडु प्रधान :-** सिडको पाणी पुरवठा (सिडको एन-७ झोन) विभागात जसे रु.५/- लाखाचा भ्रष्टाचार झालेला आहे. तेथील कर्मचाऱ्यांनी अशाच प्रकारे ५०-६० नगरसेवकांना हाताशी धरुन स्वाक्षऱ्या करवुन घेतल्या तर त्यांचे बाबतीत निर्णय लागेल काय ?

**श्री. अलफखान :-** जे पत्र ४९ सदस्यांनी लिहुन दिलेले आहे ते पत्र सभागृहात वाचुन दाखवावे.

**मा. महापौर :-** मा. आयुक्त यांनी माहिती द्यावी परंतु अशा प्रकारचे कोणतेही पत्र वा फाईल माझेकडे आलेली नाही.

**मा. आयुक्त :-** सभागृहाने मंजुर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे शहर अभियंता यांना माहे ३१ मार्च ९३ पर्यन्त ठेवण्यात आलेले होते. तथापी शासनाकडुन आलेल्या पत्रानुसार व ४९ स. सदस्यांनी शहर अभियंता यांना याच ठिकाणी ठेवणे बाबत पत्र दिलेले होते (४९ स. सदस्यांनी दिलेले पत्र सभागृहात वाचुन दाखविले) जानेवारी ९३ च्या सर्वसाधारण सभेमध्ये श्री. के.जी. पाटील, शहर अभियंता यांना ३१ मार्च ९३ पावेतो मनपा, औरंगाबाद मध्ये ठेवणे बाबत मुदतवाढ देऊन प्रस्ताव पास झालेला आहे. परंतु वरील प्रस्तावानंतर शासनाने त्यांना मुदतवाढ दिनांक ३१.५.९३ पावेतो दिलेली आहे. तरी त्यांना ३१.५.९३ पावेतो मनपा मध्येच राहु द्यावे. व त्याप्रमाणे प्रशासकीय कार्यवाही करावी. तथापि सदरचे पत्राची संचिका मा. महापौर यांचेकडे स्वाक्षरीसाठी पाठविण्यात आली. ती संचिका सही न करता परत केली याबाबत खेद वाटतो.

**श्री. प्रकाश जावळे :-** मा. आयुक्त यांनी दिलेल्या माहितीनुसार असे वाटते की, मा. आयुक्त व मा. महापौर यांच्यामध्ये आपसात गैरसमज न होता सामजस्यपण असणे आवश्यक आहे.

**मा. महापौर :-** अशा प्रकारची शहर अभियंता यांचे बाबतीत ४९ स. सदस्यांच्या स्वाक्षऱ्या असलेली कोणतीही फाईल माझेकडे आलेली नाही.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :-** मा. आयुक्त यांनी सभागृहात मा. महापौर यांचे बाबतीत जे उद्‌गार काढले त्याबाबत स. सदस्यांच्या भावना दुखावल्या आहेत. तेंव्हा त्यांनी सभागृहात त्यांचे शब्द परत द्यावे. अशी आमची मागणी आहे.

**मा. आयुक्त :-** या ठिकाणी सभागृहात मी केलेल्या निवेदनात अनवधानाने खेद हा शब्द उच्चारला आहे. तरी मी खेद परत घेत आहे व तो शब्द उच्चारल्या बद्दल दिलगीरी व्यक्त करतो.

**श्री. तकिहसनखान :-** मा. आयुक्त यांनी दिलगीरी व्यक्त करण्याची आवश्यकता नाही. जे आहेत सत्य आहे. कारण शहर अभियंता यांचे संदर्भात फाईल मा.महापौर यांचेकडे आलेली होती तथापी मा. महापौर यांनी त्या फाईलवर स्वाक्षरी करण्यास नकार दिला कारण त्यांनी शहर अभियंता यांचेकडुन पैशाची मागणी केलेली होती.

**श्री. धनंजय गंगाखेडकर ,श्री. प्रकाश जावळे,श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय,मिर्झा अन्वर बेग :-** (यावेळी सभागृहात बऱ्याचशा स. सदस्यांनी या विधानावर आक्षेप घेतला) अशा प्रकारचा मा. महापौर यांचेवर आरोप ठेवणे योग्य नसुन स. सदस्यांना विनंती करण्यात येते की,त्यांनी आपले शब्द मागे घेऊन माफी मागावी अन्यथा आम्ही त्या स. सदस्यांच्या सभागृहात निषेध व्यक्त करतो.

**मा.महापौर :-** स. सदस्य श्री. तकिहसन खान विनंती करण्यात येते की, केलेला आरोप मागे द्यावा.

**श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय :-** स.सदस्य श्री. तकिहसन खान यांनी जर शब्द परत घेतले नाही तर त्यांचे एका दिवसाचे सदस्यत्व रद्द करण्यात यावे.

**मा.महापौर :- (**या वेळी मा महापौर वेळोवेळी ओरडतात) स. सदस्य श्री. तकीहसन खान यांना वार्निग देण्यात येते की. सभागृहात जे आरोप केले ते परत घ्यावेत अन्यथा आपल्याविरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**श्री. तकिहसन खान :-** मी केलेला आरोप योग्य असुन मी आरोप परत घेणार नाही.

**मा.महापौर :-** पुन्हा एकदा २ री वार्निग स. सदस्य श्री. तकिहसन खान यांना देण्यात येते की, त्यांनी सभागृहात माझ्यावर केलेला आरोप परत घ्यावा.

**श्री. तकिहसन खान :-** मी केलेला आरोप स्पष्ट आहे. त्यात कोणताही बदल होणार नाही.

**मा.महापौर :-** पुन्हा ३ री वार्निग स. सदस्य श्री. तकिहसन खान यांना देण्यात येते की, त्यांनी आपले आरोप मागे घ्यावे.

**श्री. तकिहसन खान :-** मी आरोप परत घेणार नाही. आपणास कोणती कार्यवाही करायची ते करावे.

**मा. महापौर :-** पुन्हा एकदा स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आरोप परत घ्यावे. अन्यथा तीन महिन्यासाठी त्यांचे सदस्यत्व निलंबन करण्यात येते. सिक्युरीटी गार्डला विनंती की स. सदस्यांना बाहेर जावु घ्यावे.(यावेळी काही स. सदस्यांनी बाके वाजविले.आणि सदस्य श्री. तकिहसन खान ाहे अंदाजे १२.१५ वाजता सभागृहबाहेर गेले)

**श्री. आविनाश कुमावत :-** स. सदस्य श्री. तकिहसन खान यांनी मा. महापौर यांचे वर जे आरोप केले त्याबाबत सर्व स. सदस्यांनी निषेध व्यक्त करावा.

**मा.महापौर :-** ठिक आहे.

**श्री. धनंजय गंगाखेडकर :-** शासनाकडुन औरंगाबाद मनपास मुदतवाढ देण्याबाबतचे जे पत्र आलेले आहे ते सभागृहात वाचुन दाखववावे.

**श्री. आयुब जागिरदार**

**रशिद मामु :-** स. सदस्य श्री. तकिहसन यांना तीन महिन्यासाठीचे सदस्यत्व निलंबन केले. तेंव्हा त्यांना पुढील निवडणुकीत प्रक्रियेत भाग घेता येते किंवा नाही याची माहिती विधी सल्लागार यांचेकडुन द्यावी. (यावेळी विधी सल्लागारांशी मा. महापौर चर्चा करतात) केवळ १५ दिवसाचेच निलंबन करता येते.

**मा. महापौर :-** स. सदस्यांना निवडणुकीत भाग घेता येत नाही.

**श्री. आयुब जागीरदार :-** जर तसे असल्यास आम्ही निषेध ाव्यक्त करुन सभात्याग करतो.(स. सदस्य श्री.आयुब जागीरदार यांनी अंदाजे १२.०० वाजता निषेध करुन सभात्याग केला)

**मा.महापौर :-** शासनाकडुन जे पत्र औरंगाबाद मनपाच्या मुदतवाढी संदर्भात आलेले आहे ते मा. आयुक्त वाचुन दाखवतील.

**मा. आयुक्त :-** (शासनाचे आलेले पत्र औरंगाबाद मनपाच्या मुदत वाढी संदर्भात सभागृहात वाचुन दाखविले)

**मा. महापौर :-** आता विषय क्र.१ यास मंजुरी देण्यात येते. (यावेळी पुन्हा स. सदस्य इतिवृत्तावर चर्चा करतात.)

**श्री. रतनकुमार पंडागळे :-** इतिवृत्तातील पान क्र.१९ वर आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे बाबतीत मा. आयुक्त यांनी सादर केलेल्या अहवालाची प्रति सर्व स. सदस्य सोमारपर्यन्त देण्याचे सुचित केले होते. त्याबाबत आतापर्यन्त आम्हाला प्रति मिळाल्या नाहीत. तेंव्हा सर्व स. सदस्यांना अहवालाच्या प्रति कधी पर्यन्त देणार याची माहिती द्यावी.

**मा. महापौर :-** स.सदस्यांना सुचित करण्यात येते की. आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे बाबतीत प्राप्त झालेल्या अहवालाच्या प्रति सभा सपल्यानंतर देण्यात येईल.

**श्री. रतनकुमार पंडागळे :-** आम्हाला सभागृहातच संबंधित अहवालाच्या प्रति वाटप कराव्यात कारण जो काही अहवालाती निष्कर्ष असेल त्याबाबत सभागृहाला माहिती मिळेले. आणि आपण आश्वासन दिल्याप्रमाणे पुर्तता व्हावी. अशी आमची अपेक्षा आहे.

**मा. महापौर :-** पुन्हा एकदा स. सदस्यांना विनंती करण्यात येते की, संबंधित अहवालाच्या प्रति सभा संपल्यानंतर देण्यात येईल.

**श्री. मोतीराम घडामोडे :-** मागील दोन तीन महिन्यापासुन आपण आश्वासन दिलेले आहे त्याप्रमाणे सर्व स. सदस्यांना आरोग्य वैद्यकिय अधिकारी यांचे बाबतीतचा अहवाल सभागृहात सर्वाना द्यावा.

**श्री. मुजिब आलमशा खान :-** एका सोसायटीला समनपाच्या जागेतुन ५० प्लॉटसाठी चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांचे साठी जागा देण्यात आली होती. तथापी मनपाचे कर्मचारी श्री. दामु व चिरागोद्दीन यांनी पुन्हा उरलेल्या ५० प्लॉटवर अतिक्रमन करुन रुपये २०/२० हजारास प्लॉट विक्री करुन मनपाची खुली जागा काबीज करीत आहेत. याबाबत वरील चौकशी करुन कार्यवाही व्हावी की, नाल्यावरील जागेवर अतिक्रमण का होत आहे. व त्यावर मनपा कार्यवाही का करीत नाही. याबाबत माहिती द्यावी.

**मा.महापौर :-** मा. आयुक्त यांनी माहिती द्यावी.

**सहा. संचालक नगर :-** महापालिकेच्या चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांची सोसायटी आहे. आणि त्या सोसायटीला रचना./ जो ले आऊट १०० प्लॉटचा झालेला होता त्यापैकी ५० प्लॉट हे लिजवर दिलेले होते. आणि उरलेले ५० प्लॉट लिजवर दिलेले नव्हते परंतु कालांतराने असे लक्षात आले की, त्या उरलेल्या ५० प्लॉटवर अतिक्रमणे त्या सोसायटीने घरे बांधुन केलेले आहे. आणि म्हणुन मा. आयुक्तांकडे जाऊन त्यावेळी उरलेल्या ५० प्लॉट संबंधित सोसायाटी देणे साठी मा. आयुक्तांनी सन १९८८ ला मंजुरी दिली आहे. आणि त्यामुळे बांधलेल्या अतिक्रमीत घरांचा सर्व्हे करुन त्यांना रेगुराईज्ड कसे करता येईल याचा सर्व्हे करावा लागेल आणि नंतरच रेजुराईज्ड करण्यात येईल. (यावेळी बरेचसे स. सदस्य हळुहळु सभागृहाबाहेर जातात.)

**श्री. सुदाम वाघमारे :-** गणपुर्ती अभावी सभा तहकुब करावी.

**श्री. मुजिब आलमशा खान :-** ५० प्लॉटवर संबधित सोसायटीचे घरे आहेत. परंतु दरलेल्या ५० प्लॉटवर येथील कर्मचाऱ्यांनी रु.२०/२० हजारास इतर विक्री करुन अतिक्रमणे केलेली आहत. हा जवळपास ३ एकराचा पट्टा आहे. या भागात मनपाचा इतर विकास करण्यासाठी करीता या जागेचा उपयोग झाला असत परंतु या सर्व जागेवर अतिक्रमण होऊनही मनपाने कर्यावाही केलेली नाही. यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे.

**श्री. मोहसिन अहमद :-** याबरोबर माझ्या वार्डात जे अतिक्रमण झालेले. त्या ठिकाणी लाकडाची वरवार आहे त्याची फोटोप्रत मी सोबत आणलेली आहे. (सभागृहात दाखवतात) त्यावर सुध्दा अद्यापही कार्यवाही झालेली नाही.

**मा. महापौर :-** ठिक आहे. आठ दिवसांत याबाबत चौकशी करुन महिती देण्यात येईल. याबरोबर गणपुर्ती अभावी सभा ००.१० मिनिटासाठी तहकुब करण्यात येते. (अंदाजे वेळ १२.४५ वाजता) (सभेला सुरुवात अंदाजे दुपारी १.१० वाजता)

**श्री. मोहसिन अहमद :-** इतिवृत्तातील पान क्र.३ व ६ मधील माझ्या वार्डातील मनपा खुल्या जागेची शिट नं.५४ व पी. आर. कार्ड नं.९६७२/११ मधील जागेबाबत एका महिन्याच्या आत चौकशी करुन माहिती देण्यात येईल असे सुचित केले होते त्यानुसार काय कार्यवाही झाली याची माहिती द्यावी व त्यानुसार यात वरील दुरुस्ती व्हावी.

**मा. महापौर :-** या बाबत मा. आयुक्त माहिती देतील.

**मा. आयुक्त :-** (या संदर्भात अहवाल विधी सल्लागार यांचेकडील सभागृहात वाचुन दाखविला) रोषनगेट येथील स. नं.९६७२/११ सीट नं.४९ ही जियाऊद्दीन ले आऊट मधील मोकळी जागा आहे. त्या जागेवर श्री. शेख अब्बास पीता शेख चांद रा. रोषनगेट यांनी अतिक्रमण करुन लाकडाच्या बखारी टाकण्याचे आढळुन आले आहे. म्हणुन पंचनामा करुन त्या काढण्याची कार्यवाही दि. २६.९.८८ ला आदेशीत करण्यात आली. तथापी श्री. शेख अब्बास यांनी दावा दाखल करुन असे न्यायालयाचे निर्दशनास आणुन दिले आहे की, वरील जागा ही सन१९७६ पासुन त्यांचे ताब्यात असुन सदरील जागेवर ते लाकडाचे बखारीच्या व्यवसाय करीत आहेत. ती जागा त्यांच्या ताब्यात जवळ जवळ १२ वर्षापासुन असुन त्यांची उपजिवीका त्याच्या वरच अवलंबुन आहे.

वरील प्रकरणात न्यायालयाचा अंतिम निर्णय लागेपर्यन्त अर्जदाराचे व्यवसायात उपरोक्त जागेवर कोणतीही अडचण आणु नये म्हणुन न्यायालयाने मनाई आदेश दिलेला आहे. तसेच प्रकरण साक्षी पुराव्यासाठी दिनांक २७.४.९३ ला ठवलेले आहे.

**श्री. अहमद एकबालुद्दीन :-** स. स. श्री तकिहसन खान यांचे सरस्यत्व तीन महिन्यासाठी निलंबीत केले या बाबत विधी सल्लागारांनी आपले मत द्यावे.

**मा.महापौर :-** या निर्णयाबाबत शासनाकडे पत्र पाठवुन शासन नियमाप्रमाणे पंधरा दिवसाचे निलंबन केल्याचे आदेश आल्यास तसे करणे शक्य होईल. पण सध्या तीन महिन्याचे निलंबनचा निर्णय दिलेला आहे.

**श्री. मोहसिन अहमद :-** मी मनपाच्या खुल्या जागेच्या संदर्भात असे निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, सन १९८९ मध्ये ती जागा मनपाच्या नांवे पी.आर.कार्ड वर होते. परंतु आता त्या जागेवर संबंधित व्यक्तीने अतिक्रमण करुन आपला व्यवसाय सुरु ठेवलेला आहे. आणि मी १९८८ पासुन सतत मनपाकडे पाठपुराव करुनही अद्याप काहीही केलेले नाही याची विधी सल्लागारांनी व कार्यालयाने सविस्तर चौकशी केलेली नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल :-** स. स. श्री मोहसिन अहमद हे या बाबतचा मुद्दा सभागृहात बऱ्याच वेळेस उपस्थित करित आहेत. तेंव्हा त्यांच्या पोट निवडीच्या मुद्दयावर व मनपाच्या खुल्या जागेवर अशा प्रकारचे अतिक्रमण होत असल्यास त्याची त्वरीत चौकशी होऊन कार्यवाही व्हावी.

**श्री. मोहसिन अहमद :-** या संदर्भात सन १९८९ ला सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव मंजुर झालेला होता. की सदरील जागेवर अतिक्रमण असल्यास त्या जागेबाबत कार्यवाही करुन ताब्यात घेण्यात यावी परंतु तेव्हापासुन ही काहीच कार्यवाही झालेली नाही याचा मला खेद वाटतो.

**श्री. सुदाम वाघमारे :-** सबजीमंडी येथेही अशाच प्रकारची घटना घडलेली आहे. येथील मनपाच्या एका खुल्या जागेवर माजी नगरसेवकांच्या नातेवाईकाने अतिक्रमण

करुन जागा वापरत आहे त्याबाबत सर्व कागदपत्रांच्या पुरावा दाखल करुनही स्टे व्हॅकेट होऊ शकत नाही तर ॲड बोरकर वकीलांची याबाबत काहीही कार्यवाही केलेली नाही. आम्ही मालमत्ता अधिकारी व विधी सल्लागार यांना वारंवार विनंत्या केली परंतु त्या जागेबाबत निर्णय होऊ शकला नाही. तेंव्हा विनंती आहे की, मनपाच्या पॅनेलवर असलेले अशा प्रकारचे ॲड.यांचे सहकार्य होत नसल्यास त्यांना पॅनलवरुन काढुन टाकण्यात यावे.

**श्री. मोहसिन अहमद :-** मी विचारलेल्या प्रश्नांसंदर्भात मा. आयुक्त किती दिवसात कार्यवाही करतील कृपया माहिती द्यावी व तेथील सर्व साहित्या हटविणे आवश्यक आहे.

**मा.आयुक्त :-** या बाबत कोर्टाचा जो निर्णय आलेला आहे त्या संबंधात तपासुन घेण्यात येईल. त्यात कोणतीही कोर्टाची अडचण नसल्यास अतिक्रमण काढण्यात येईल. या ठिकाणी जो अहवाल दाखविलेला आहे त्या बाबत साक्षी पुराव्यासाठी दि.२७.४.९३ रोजी वकिलामार्फत दाखल करण्यात येईल.

**श्री. मोतीराम घडामोडे :-** स.स. नी सुचित केल्याप्रमाणे त्या जागेवर जे अतिक्रमण होते आहे व बांधकाम होत आहे. किमान तेथील सामान जप्त तरी करावयास पाहिजे.

**श्री. सुदाम वाघमारे :-** संबजीमंडीमधील जागेबाबत कोर्टाचा काय आदेश आहे याची माहिती विधी सल्लागारांनी द्यावी.

**मा. महापौर :-** विधी सल्लागारांनी माहिती द्यावी.

**विधी सल्लागार :-** स.स. श्री मोहसिन अहमद यांनी सुचित केल्यानुसार सदरच्या जागेबाबत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे व न्यायाल्याच्या निर्णयानुसार त्या ठिकाणचे कोणतेही बांधकाम पाडु नये असा आदेश आहे. तथापी त्या ठिकाणी अतिक्रमण वाढत आहे. आणि नविन बांधकाम होत आहे. तर मनपातर्फे बांधकाम पाडण्याची कार्यवाही कायदेशीर करण्यात येईल आणि आपण जो पुरावा दाखल केलेला आहे. इसार पावतीचा न्यायालयाच्या निदर्शनास आणुन ती मालमत्ता मनपाच्या खुल्या जागेतील आहे. आणि ती खुली जागा इतर कुणीही हस्तांतर करु नये अशा प्रकारचा पेपरमध्ये जाहिर प्रगटन देण्यात येणार आहे.आणि सदरची जमिन पुर्णतः ट्रान्सफर करु नये अशी न्यायालयाच्या निर्दशनास आणुन देण्यात येईल. आणि दुसरा मद्दा स.स. श्री. वाघमारे यांनी संबजीमडी बाबतचा मुद्दा उपस्थित केला.

**श्री. मोहसिन अहमद :-** मनपाच्या खुल्या जागेबाबत कार्यवाही किती दिवसापर्यन्त करणार कारण संबंधित व्यक्तीने अतिक्रमण करुन दुस-यांना इसार पावतीने जागा विकलेली आहे तेंव्हा ४२० च्या कायदयान्वेये संबंधितास केस दाखल करणे आवश्यक होते. व तेथील सर्व सामान जप्त करणे योग्य होईल. व साईट इन्सपेक्शन व्हावे.

**विधी सल्लागार :-** साक्षी पुराव्यासाठी २०.४.९३ ही तारीख आहे त्यानंतर कार्यवाही करण्यात येईल. व आठ दिवसापर्यन्त वर्तमान पत्रात जाहिर प्रगटन देण्यात येईल.

**सौ. लता दलाल :-** माझ्या वार्डातील नेहरु प्लेसच्या बाजुला एका व्यक्तीने मनपाच्या जागेवर अतिक्रमण करुन. वेश्या व्यवसाय सुरु केलेला आहे. त्याबाबत मालमत्ता अधिकारी यांनी संबंधित जागेवर सर्व्हे करुन त्या ठिकाणी संरक्षण भिंत बाधुन ते अतिक्रमण हटविणे आवश्यक आहे.

**मालमत्ता अधिकारी :-** वरिल प्रकरणी सर्व्हे करुन मा. आयुक्तांना रिपोर्ट दिलेला आहे त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. व पोलिस फोर्ससाठी व संरक्षणासाठी मागणी पत्र पोलिस कार्यालयाला दिलेले आहे. परंतु पोलिस फोर्स न मिळाल्याने प्रकरण स्थगित आहे.

**सौ.लता दलाल :-** वेळावेळी पोलिस फोर्स मिळत नसल्याने कार्यवाही केली नाही असे म्हणने योग्य नाही व त्या जागेवरील अतिक्रमण हटविणे आवश्यक आहे.

**मा. महापौर :-** ठिक आहे मालमत्ता अधिकारी यांनी पोलिस कार्यालयास पाठविलेले पत्र सभागृहात वाचुन दाखवावे मागील बैठकीत मी सुचित केलेले होते की, पोलिस संरक्षणाची गरजेची कट न पाहता आपल्या विभागामार्फत योग्य ती कार्यावाही करावी तरिही मालमत्ता अधिकाऱ्यांनी काहीच कार्यवाही केलेली नाही. त्याबाबत स.स.ना सुचित करण्यात येते की,काय करावे ते सर्वानी सभागृहात सुचवावे.

**श्री. सुदाम वाघमारे :-** पोलिस कार्यालयाकडे कागन्नीजन्स दाखल करावे त्याप्रमाणे ते मदत करतील.

**सौ.लता दलाल :-** प्रशासनास पोलिस मदत का मिळत नाही. याचे नेमके कारण काय याची माहिती द्यावी. जे शब्द या सभेत दिले जाते त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**श्री. अविनाश कुमावत :-** पोलिसांची मदत न मिळाल्यास अतिक्रमण हटविता. येणार नाही काय?

**मालमत्ता अधिकारी :-** बऱ्याच ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो त्यामुळे पोलिसांची मदत मिळणे आवश्यक ाअहे.

**मा.महापौर :-** मा. आयुक्त यांनी माहिती द्यावी.

**मा.आयुक्त :-** अतिक्रणाबाबत पोलिस कार्यालयाला पत्र लिहिले आहे . सदरची संचिका या ठिकाणी उपलब्ध नाही नसता पत्र वाचुन दाखविले असते काही ठिकाणी पोलिसांची मदत घेणे जरुरीचे असते कारण कायदा व सुव्यवस्थेची प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते ज्या ठिकाणी आपल्या सिक्युरीटीचे मदतीने जेवढे अतिक्रमण काढता येतील ते काढण्याचे आम्ही प्रयत्न करतो. परंतु काही महत्वाचे ठिकाणी पोलिसांची मदत घेणे आवश्यक आहे. त्यासाठी पोलिस मदत आम्ही मागितलेली होती जर पोलिस मदत मिळत नसल्यास सिक्युरिटी गार्डचा मार्फत जेवढे शक्य आहे ते हटविण्याचे कामे केले जाईल.

**श्री. अविनाश कुमावत :-** पान क्र.१४ मध्ये जवाहर कॉलनी येथील पोलिस चौकी हटवुन त्या ठिकाणी दवाखाना सुरु करण्यात येईल त्या बाबत काय झाले.

**श्री. मोतीराम घडामोडे** : मुंबई मनपाने अतिक्रमण हटविणे बाबत कायम स्वरुपी पोलिस ठेवलेले आहे. तशी व्यवस्था होणार आहे काय ? या निमित्ताने.

**मा.महापौर :-** मा. आयुक्त यांनी माहिती द्यावी.

**मा.आयुक्त :-** जवाहर कॉलनी येथील पोलिस चौकीच्या जागी आरोग्य केंद्र सुरु करणे बाबत कायदेशीर पत्र पोलिस आयुक्तांना दिलेले होते त्याप्रमाणे पोलिस आयुक्त कार्यालयातील अधिकरी या ठिकाणी येऊन हिअरिंग किंवा चौकशी झालेली आहे आणि पोलिस आयुक्तांनी येत्या माहे जुन पर्यन्त प्रशासकिय कारणास्तव जागा आम्हाला राहु द्यावी.अशी विनंती केलेली आहे.

**श्री. अविनाश कुमावत :-** तीन महिन्याची मुदतवाढ त्यांना देण्यात येते. परंतु त्यापुढे तरी पोलिस चौकी रिकामी करुन द्यावी व दवाखाना सुरु करावा.

**श्री. मातीराम घडामोडे :-** पान क्र.१४ मध्ये सुचित केल्याप्रमाणे मनपान टेमपररी शेड बांधुन त्या ठिकाणी पोलिस चौकीला इमारत भाडयाने देण्यात यावे. त्यानुसार पान क्र.१५ वर मा.महापौरांनी ठिक आहे असे म्हटले त्याप्रमाणे कार्यवाही करावयास काय झाले ?

**मा.आयुक्त :-** पोलिस चौकी हटविणे संदर्भात पुर्वीचे पोलिस आयुक्तांनी सांगितले होते परंतु मागच्या पोलिस आयुक्तांनी असा प्रस्ताव ठेवलेला होता की, समोर जी मोकळी जागा आहे ती आम्हाला देण्यात यावे व त्या ठिकाणी तंबु टाकुन आमची पोलिस चौकी चालु राहिल त्याप्रमाणे मनपामार्फत समोरील जागा लेव्हलींग देखील करुन दिली तेवढयाच कालावाधीत पाहिजे आयुक्त बदलुन गेले व दुसरे आयुक्त आले त्यांच्याही निर्देशनास ही बाब आणुन कदिली व ततपुरते शेड टाकुन त्या ठिकाणी पोलिस चौकी सुरु करावी परंतु त्यास योग्य तो प्रतिसाद मिळालेला नाही.

**श्री. मोतीराम घडामोडे :-** आयुक्तांना रु.३ लाखाचे अधिकार आहेत तेंव्हा ठिकाणी शेड बांधुन देवुन त्यांना भाडयाने दिल्यास हरकत नाही.

**श्री. प्रदिप जैस्वाल :-** मंबई प्रा.मनपा अधिनियमात अशी तरतुद आहे की, मनपा आयुक्तांनी पत्र लिहिल्यानंतर पोलिस कार्यालयानी ताबोडतोब मदत करावी.

**श्री. रतनकुमार पंडागळे**

**श्री.बंडु प्रधान :-** शिवाजी मैदान (आमखास) या ठिकाणी डॉ.आंबेडकर रिर्सच सेंटर आहे त्या ठिकाणी बऱ्याच मोठया प्रमाणात अतिक्रमण होत आहे. त्या बाबत त्वरीत कार्यवाही व्हावी कारण ही जागा व्ही आय पी म्हणुन संबोधली जाते.

**मा.महापौर :-** विधी सल्लागार यांनी या संदर्भात पाहणी करावी आणि कोर्टात प्रकरण चालु असल्यास त्याची पाहणी करुन त्वरीत कार्यवाही करुन स्टे व्हॅकेट करावा. तेथील अतिक्रमण हटविण्यात यावे.

**श्री. अजिजुल्ला बेग :-** टी.बी. हॉस्पीटलच्या समोरील बाजुस सिटी क्लब आहे तो जिल्हाधिकारी मार्फत हटविण्याचा प्रस्ताव मंजुर केलेला होता तेंव्हा ते हटवुन त्यांना पर्यायी जागेची व्यवस्था करण्यात यावी. त्याबाबत काय झाले याची माहिती द्यावी.

**मा.आयुक्त :-** सदरची माहिती या ठिकाणी उपलब्ध नाही. त्यामुळे माहिती नंतर सांगता येईल.

**श्री. मधुकर शिंदे :-** पान क्र.११ वर जालना रोडवरील क्रांतीनगर येथील अतिक्रमणे हटविणेच्या संदर्भात सुचना केलेली होती त्याबाबत काय झाले.

**मा.महापौर :-** संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :-** पोलिस मदत न मिळाल्याने बरेचशे अतिक्रमणे काढण्याचे प्रलंबीत आहेत याबाबत डी.आय.जी. व पोलिस आयुक्त कार्यालयाकडे पोलिस मदत मिळण्यासाठी विनंती अर्ज केलेला होता तसेच जिल्हाधिकारी यांनी सुध्दा दि. १६.४.९३ च्या बैठकीत सुचना केलेल्या होत्या त्याप्रमाणे आद्यापही कार्यवाही झालेली नाही. पर्यायाने अतिक्रमण हटविणे प्रलंबित आहेत.

**श्री. मधुकर शिंदे**

**प्रदिप जैस्वाल :-** वेळोवेळी या रोडवर अपघात होतात त्यामुळे पोलिसांची वाढ न पाहता मनपाने अतिक्रमणे हटवावीत.

**मा.महापौर :-** मा. आयुक्त यांनी सुचित केल्याप्रमाणे पोलिस मदत न मिळाल्यास आपल्या सिक्युरिटी कडुन आपण अतिक्रमणे हटविण्याचे काम उद्यापासुन करु.

**श्री. बंडु प्रधान :-** पान क्र.२४ वर नागसेननगर ऐवजी नागसेनवन हे वाक्य आले आहे त्यामध्ये दुरुस्ती व्हावी.

**मा.महापौर :-** ठिक आहे.दुरुस्ती व्हावी.

**श्री. मोतीराम घडामोडे :-** मागील बैठकीत ठरल्याप्रमाणे जळगांव येथे एक अभ्यास समिती पाहणी करण्याचा दौरा करणार आहे तेंव्हा तारिख निश्चित करावी.

**मा.महापौर :-** इतिवृत्त कायम झाल्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल आता विषय क्र.१ यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इतिवृत्तातील पान क्र.२४ वरील ठराव क्र.१३५/५ मध्ये नागसेननगर असे वाक्य आहे त्या ऐवजी नागसेनवन असे टाईप झाले त्या ऐवजी "नागसेननगर" अशी दुरुस्ती करण्यात येते व इतर दुरुस्त्यासह दि.१८.३.९३ रोजी संपन्न झ ालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम कराण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधकिय कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१/१४०** :-दिनांक १८.३.९३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव क्र. १/१४० :-** प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे इतिवृत्तातील पान क्र.२४ वरील ठराव क्र.१३५/५ मध्ये नागसेननगर असे वाक्य आहे. त्या ऐवजी नागसेनवन असे टाईप झाले. त्या एवजी "नागसेननगर" दुरुस्ती करण्यात येते या व इतर दुरुस्त्यासह इि.१८.३.९३ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही आहे.

**विषय क्र.२/१४१ :-** गोल्डन स्पोर्टस असोसिएशन मराठवाडा. औरंगाबाद यांनी मियाभाई रेखांकनातील खुली जागा न.भु.क्र.१२०८९/२१ क्षेत्र ६४० चौ.मी. खुल्या जागेपैकी व्यायाम शाळेसाठी बांधकाम करण्यास जागा मिळण्यास अर्ज केला आहे.

नगर भुमापन क्रमांक १२०८९/२१ क्षेत्र ६४० चौ.मी. ही जागा वार्ड क्र.३५ मधील मियाभाई रेखांकन , न्यु कॉलनी येथील रेखांकनाची खुली जागा असुन महानगरपालिकेच्या नावाने मिळकत पलिकेन नोंद झालेली आहे. बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम क्र.१३-३-१-३ (१) अन्वये रेखांकनाच्य खुल्या जागेच्या १० टक्के व जास्तीत जास्त २०० चौ.मी. यापेक्षा जे कमी असेल तेवढे क्षेत्र विकास नियंत्रण नियमावलीचे नियम क्र.१३.३.१.३ (२)(३)प्रमाणे म्हणजेच ६४ चौ.मी. जागा लीनमॅशियम, पॅव्हेलियन तत्सम प्रकारच्या बांधकामास फक्त तळमजल्यासाठीच अनुज्ञेय होतो. गोल्डन स्पोर्टस ऑफ मराठवाडा, औरंगाबाद ही एक नोंदणीकृत संस्था असुन त्याचा नोंदणी क्रमांक एफ ९२५ (औरंगाबाद) दिनांक ३१.१२.८२ असा आहे वर प्रस्तावित केल्याप्रमाणे रेखांकनातील खुल्या जागेपैकी ६४.०० चौ.मी. जागा व्यायाम शाळेच्या वापरांसाठी देय आहे. सबब सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.२२/५ दि.२०.६.९२ रोजी ज्योतीनगर डेव्हलपमेंट फउन्डेशन औरंगाबाद यांना ज्योतीनगर रंखांकनाच्या खुल्या जागेपैकी १०० चौ.मी. जागा ९९ वर्षाच्या भाडेपट्टयांनी ज्या अटी व नियमाप्रमाणे प्रदान करण्यात आली त्याच धर्तिवर सदरहु संस्थेस व्यायाम शाळेसाठी जागा देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**मा.महापौर :-** मंजुर .

**ठराव क्र.२/१४१ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गोल्डन स्पोर्टस असोशिअनस मराठावाडा, औरंगाबाद यांनी मियाभाई रेखांकनातील खुली जागा न.भु. क्र.१२०८९/२१ जिचे क्षेत्र ६४० चौ.मी. आहे. बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम क्र.१३.३.३ (१) अन्वये रेखांकनाच्या खुल्या जागेच्या १० टक्के व जास्तीत जास्त २०० चौ.मी. यापैक्षा जे कमी असेल तेवढे क्षेत्र विकास नियंत्रण नियमावलीचे नियम क्र.१३.३.१३ (२) (३) प्रमाणे म्हणजेच ६४ चौ.मी.जागा जिम्नॅशियम पॅन्हेलियन तत्सम प्रकारच्या बांधकामास फक्त तळमजल्यासाठीच अनुज्ञेय होतो. सदरील संस्था नोंदणीकृत असुन तिचा नोंदणी क्र.एफ-९२५ (औरंगाबाद) दि.३१.१२.८२ असा आहे सदरील रेखांकनातील खुल्या जागेपैकी ६४.०० चौ.मी. जागा व्यायाम शाळेच्या वापरासाठी ९९ वर्षाच्या भाडेपटयानी इतर अटी व नियमाप्रमाणे प्रदान करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.३/१४२ :-** मा. उप संचालक , नगर रचना, विकास योजना औरंगाबाद यांनी त्यांचे कडील पत्र क्र. वि.यो. / औरंगाबाद (सु) मुदतवाढ /उसंनर वियो - औ/ १११ दिनांक १०.३.९३ अन्वये औरंगाबाद शहराची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करण्यासाठी ५.४.९३ ते ४.१०.९३ पर्यन्त पुढील सहा महिन्यासाठी मदतवाढ घेणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. औरंगाबाद महानगरपालिका सर्वसाधारण सभा दि.१९.१.९३ ठराव क्रमांक ९२/६ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये सुधारित विकास योजना प्रसिध्द करण्यासाठी दि.५.१०.९२ ते ४.४.९३ पर्यन्त मुदत वाढ करणेचा पाईत झालेल्या ठरावा प्रमाणे इकडील पत्र जा.क्र.मनपा/ नरवि/वि.यो.(सु) /६४६/९३ दिनांक २.३.९३ अन्वये मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य,पणे यांना मुदतवाढीच्या प्रस्ताव सादर केला आहे. आता या कालावधीत विकास योजना प्रसिध्द करणे शक्य नसल्यामुळे व त्यासाठी मुदतवाढ घेण्याबाबत मा. उपसंचालक नगर रचना, विकास योजना, औरंगाबाद यांनी कळविले असल्यामुळे पुढील ६ महिन्याचा मुदत वाढीचा प्रस्ताव म्हणजेच दि. ५.४.९३ ते ४.१०.९३ पर्यन्त मा संचालक नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**विषय क्र.४/१४३ :-** औरंगाबाद महानगरपालिकेचा सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.१२८/५ दि.१७.३.९२ अन्सये मोहल्ला पन्नालालनगर येथील आरक्षण क्र. १०५ "खुली जागा" पैकी ५५२५-०० चौ.मी. जागा रु ६०,०००/- प्रति वर्षाप्रमाणे ३०(तीस) वर्षांच्या भाडेपट्टयाने देण्यास आणि "खुली जागा" हे आरक्षण बदलुन "महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अपकेंद्र" वापरासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये गौण फेरबदल करण्यास पारिन केलेल्या ठरावा प्रमाणे, प्रस्तन गाण फेरबदलची अधिसुचना स्थानिक वर्तमान पत्रात (दै. अजिंठा दि. ११.९.९२) व महाराष्ट्र शासन राजपत्र औरंगाबाद विभाग पुरवणी भाग एक "अ" चे पान की, १ व २ वर प्रसिध्द झाले या अधिसुचनेव्दारे लोकांच्या सुचना वा हरकत मागविण्यात आले असता विहित मुदतीत आणि आतापर्यन्त एकही सुचना वा हरकत महानगरपालिकेस प्राप्त झाली नाही. सबब अशा प्रकारे महानगरपालिकेने वरील अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये आवश्यक असलेल्या बाबींची पुर्तता केली असुन सदर प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी पाठविणेस सर्वसाधारण सभेच्या अंतिम ठरावासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**संवाद**

**मा.महापौर :-** मंजुर.

**ठराव क्र.४/१४३:-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पन्नालालनगर येथील आरक्षण क्र. १०५ "खुली जागा" पैकी ५५२५.०० चौ.मी. जागा रु.६०,०००/- प्रति वर्षाप्रमाणे ३० (तीस) वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यास आणि खुली जागा हे आरक्षण बदलुन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे उपकेंद्र "हया वापरासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये परित केलेल्या ठरावाप्रमाणे गौण फेरबदल करण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रात अधिसुचना काढली असता विहित मुदतीत आणि आतापर्यन्त एकही सुचना वा हरकत महानगरपालिकेस प्राप्त झाली नाही. वरिल अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये आवश्यक असलेल्या बाबींची पुर्तता केली असुन सदरचा प्रस्ताव शासनाच्या मंजुरीस्तव पाठविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५/१४४ :-** खडकी स्पोर्टस असोसिएशन औरंगाबाद यांनी हिराखान फॅक्टरी, रेल्वेस्टेशन येथील अशोक जैन फॅमीली ट्रस्टच्या रेखांकनातील खुल्या जागेपैकी क्रिडा व तत्सम वापरासाठी मागणी केली आहे.

नगर भुमापन क्रमांक १८३४९/१//१०१/ क्षेत्र ६९९४.०० चौ.मी. ही अशोक जैन फॅमिली ट्रस्ट , रेल्वेस्टेशन, हिराखान, फॅक्टरी या रेखांकनाची खुली जागा आहे. मंजुर रेखांकनाची खुली जागा म्हणुन मिळकत पालिकेत नोंद झाली आहे. बांधकाम परवानगी व विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम क्रमांक १३/-३-१-३-(१) अन्वये रेखांकनाच्या खुल्या जागेच्या १०% व जास्तीत जास्त २००.०० चौ.मी. यापैकी जे कमी असेल तेवढे क्षेत्र म्हणजेच २००.०० चौ.मी. सदर नियमावलीचे नियम क्रमांक १३.३.१.३(२) (३)प्रमाणे जिमनाशिया, पॅव्हेलियन, तत्सम प्रकारच्या बांधकामास फक्त तळमजल्या साठीच अनुझेय होते.

खडकी स्पोर्टस् असोसिएशन औरंगाबाद ही एक नोंदणीकृत संस्था असुन त्याचा नोंदणी क्रमांक एफ २०२३ (औरंगाबाद) दिनांक ७.१२.९१ असा आहे. वर प्रास्तावित केल्याप्रमाणे रेखांकनातील खुल्या जागेपैकी २००/- चौ.मी. जागा क्रिडा व तत्सम वापरासाठी देत आहे. यापैकी सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक २२/५ दिनांक २०.६.९२ अन्वये ज्योतीनगर फाऊन्डेशन औरंगाबाद यांना ज्योतीनगर रेखांकनाच्या खुल्या जागेपैकी १००.०० चौ.मी. जागा ९९ वर्षाच्या भाडेपट्टयाने ज्या अटी व नियमाप्रमाणे प्रदान करण्यात आली त्याच धरतीवर खडकी स्पोर्टस् असाशिएशन औरंगाबाद या नोंदणीकृत संस्थेस २०० चौ.मी. जागा पॅव्हेलियन क्रिडा व तत्सम अनुझेय वापरासाठी जागा देण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरी साठी सादर

**संवाद**

**मा. महापौर :-** मंजुर

**ठराव क्र.५/१४४** :-प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खडकी स्पोर्टस असोशिएशन ही नोंदणीकृत संस्थ असुन नोंदणी क्र. एफ २०२३ (औरंगाबाद) दि.७.१२.९१ असा आहे या संस्थेनी हिराखान फॅक्टरी. रेल्वेस्टेशन येथील अशोक जैन फॅमीली ट्रस्टच्या रेखांकनातील खुल्या जागेपैकी क्रिडा व तत्सम वापरासाठी न.भु.क्र.१८३४९/१/१०१ जीचे क्षेत्र ६९९४.०० चौ.मी. आहे यातील बांधकाम परवानगी व विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम क्र.१३.३.१.३ (१)

अन्वये रेखांकनाच्या खुल्या जागेच्या १०% व जास्तीत जास्त २००.०० चौ.मी. यापैकी जे कमी असेल तेवढे क्षेत्र नियमावलीचे नियम क्र. १३.३.१.३(२)(३) प्रमाणे जिम्नॅशियम, पॅव्हेलियन, तत्सम प्रकारच्या बांधकामास फक्त तळमजल्या साठीच अनुज्ञेय होते. या असोसिएशनला मनपा नियम व अटीच्या अतिन राहुन ९९ वर्षाच्या भाडेपट्टयावर जागा वापरासाठी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६/१४५ :-** प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या वाढता व्याप व कार्यक्षेत्र पहाता महानगरपालिकेच्या एकुण ७ विभागीय कार्यलयामध्ये सहाय्यक विभागीय अधिकारी यांचे पद निर्माण करण्यासाठी प्रत्येक झोनमध्ये १ या प्रमाणे ७ सहाय्यक विभागीय अधिकारी यांची पदे वेतनश्रेणी रु. १६४० ते २९०० या मध्ये निर्माण करण्यास शिफारस करण्यांत येते उपरोक्त पदास मंजुरी देण्यांसाठी प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर

**संवाद**

**मा. महापौर :-** मंजुर

**ठराव क्र. ६/१४५ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या वाढता व्याप व कार्यक्षेत्र पाहता महानगर पालिकेच्या एकुण ७ विभागीय कार्यालयाप्रमाणे सहाय्यक विभागीय अधिकारी यांचे पद निर्माण करण्यासाठी प्रत्येक झोनमध्ये एक याप्रमाणे सात सहाय्यक विभागीय अधिकारी यांची पदे वेतन श्रेणी स. १६४० ते २९०० यामध्ये निर्माण करण्यास सर्वानुंमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७/१४६:-** प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेचे वाढते कार्य लक्षात घेता लिपीक कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी पडत आहे. त्यामुळे मनपाच्या आस्थापनेवर वेतन श्रेणी रु. ९५० ते १५०० सुधारीत (२६० ते ४९५ असुधारित) मध्ये लिपिकांच्या २० जागा निर्माण करणे आवश्यक आहे. सदरील लिपीक प्रत्येक झोनमध्ये २ या प्रमाणे एकुण ७ झ ोनमध्ये १४ व मुख्य कार्यालयामध्ये ६ असे एकुण २० देण्यात येतील. सदरील पदे निर्माण केल्या मुळे दैनंदिन वेतनावर कर्मचारी घ्यावे लागणार नाही. करिता मनपाच्या आस्थापनेवर एकुण २० लिपिकांची पदे निर्माण करण्याच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर

**संवाद**

**मा. महापौर :-** मंजुर

**ठराव ७/१४६ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेचे वाढते कार्य लक्षात घेता लिपीक कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी पडत आहे. त्यामुळे मनपाच्या आस्थापनेवर वेतनश्रेणी रु ९५० ते १५०० सुधारित (२६० ते ४९५ असुधारित) मध्ये लिपिकांच्या २० जागा निर्माण करणे आवश्यक आहे. सदरील लिपीक प्रत्येक झोनमध्ये दोन या प्रमाणे एकुण सात झोनमध्ये चौदा व मुख्य कार्यालयात सहा असे एकुण वीस लिपीकांची पदे निर्माण करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *" पुरवणी विषय पत्रिका"*

औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

दिनांक २०.४.९३ च्या सर्वसाधारण सभेकरिता " पुरवणी विषय पत्रिका"

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम १९४९ चे अनुसुचीचे प्रकरण २ आणि नियम क्र १ (ज) अन्वये)

**विषय क्र. १/१४७:-** (१) वार्ड क्र. ३५ कैसर कॉलनी येथील श्री. एम. एम बेग कॉन्ट्रक्टर यांचे घरावरुन ४० फुट डि.पी. रोड चाललेला आहे. ज्याचा शीट क्र.४८ असा आहे. व सी.टी. एस. नं.९६६६ पुर्व तसेच ८६६७ आणि १२०८९ पश्चिमेचा भाग या रुंदीकरणा मध्ये जात आहे. तसेच दक्षिणेस सी.टी. एस. नं. ९३६० ते उत्तरेस ९७०२ पर्यंतचा सुध्दा भाग यात जात आहे. वास्तविक पाहता ही सर्व घरे अंदाजे २५/३० वर्षी पुर्वीची आहेत व मनपाने सर्व सुविधा त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या सुध्दा आहे.

तरी वर लिहिलेले सिट नं. व सी.टी.स. नं. वरुन जाणारे रोड रद्द करण्यात यावे.

(२) किराडपुरा ते हत्तेसिंगपुरा येथील रोडच्या रुंदिकरणामध्ये श्री. अब्दुल सत्तार ह्यांची स्वत:ची जागा सि.टी. एस. नं ११६०२ मधील भाग ४०x १००० चौ. फुट जागा मिळालेला नाही.

तरी म.न.पा. ने त्वरीत मोबदला देण्याची व्यवस्था करावी.

सुचक : श्री. मोहसिन अहमद

अनुमोदक : श्री. श्री. प्रदिप जैस्वाल, श्री. वाघमारे एस.बी.
श्री. अजिमखान दादामियॉ श्री. इगबालसिंग गिल.

**संवाद** :

**मा. महापौर** : मंजुर व यातील अनु. क्र. २ बाबत प्रस्ताव होऊच शकत नाही. तरीही संबंधीत व्यक्तीच्या मालकीची जागा आहे. काय ते तपासुन नंतरच योग्य ती कार्यवाही व्हावी.

**श्री. मुजीब आलमशा खान** : सदरील जागा मुळ व्यक्तिच्या मालकीची आहे काय ? ते तपासुन घ्यावे.

**मा. महापौर** : सहा. संचालक नगररचना यांनी माहिती द्यावी.

**सहा. संचालक** : नगर रचना : सदरच्या संचिकेत काय दर्शविलेले आहे ते पाहिल्यानंतरच सांगणे योग्य वाटते.

**ठराव क्र. १/१४७** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ३५ कैसर कॉलनी येथील श्री. एम.एम.बेग कॉन्ट्रक्टर याचे घरावरुन ४० फुट डि.पी. रोड जात आहे. ज्याचा शिट क्र. ४८ असा आहे. व सि.टि.एस. नं. ९६६६ तसेच ८६६० आणि १२०८९ पश्चिमेचा भाग या रुदिकरणामध्ये जात आहे. तसेच दक्षिणेस सिटिएस ९३६० ते उत्तरेस ९७०२ पर्यंतचा सुध्दा भाग यात जात आहे. येथे गेले २५/३० वर्षापासुनची घरे बसलेली असुन त्यांना नागरी सुविधा मनपातर्फे प्राप्त झालेल्या आहेत. तरी सिट नं. व सिटिएस नंबर वरुन जाणारे डि.पी. रोड रद्द करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. व याच प्रस्तावातील अनु क्र. २ बाबत संबंधित व्यक्तीच्या मालकिची जागा आहे काय ते तपासुनच पुढील कार्यवाही व्हावी अन्यथा नाही. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २/१४८** : माहे जानेवारी १९९३ मध्ये मो. सिल्लेखाना येथील श्री. अ. वहाब यांची भंगार दुकानात अचानक आग लागल्यामुळे हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे. व सदरील दुकानात श्रीमती फातेमा बेगम भ. अं. कादर यांची मृत्यु झाली आहे. सदरील दुकानाचे पुर्ववसनासाठी आपले मनपा तर्फे श्री. अ वहाब यांना र. रु १०,०००/- ची मदत देणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री. अजिमखान दादामियॉ

अनुमोदक : श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहर

दिनांक : ८.४.९३

**संवाद**

**मा. महापौर** : मंजुर विशेष बाब म्हणुन.

**ठराव क्र. २/१४८** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे माहे जानेवारी १९९३ मध्ये मो सिल्लेखाना येथील श्री. अ. वहाब यांची भंगार दुकानात अचानक आग लागल्याने हजारो रुपयाचे नुकसान झाले व सदरील दुकानात श्रीमती फातेमा बेगम भ. अ. कादर याचा मृत्यु झाला सदरील दुकानाचे पुर्नवसनासाठी मनपातर्फे श्री. अ वहाब अ. कादर यांना रु. १०,०००/- (अक्षरी रु. दहा हजार) "विशेष बाब म्हणुन" मंजुर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३/१४९** : औरंगाबाद महानगरपालिका अस्थापनेवर शहर अभियंता, कार्यकारी अभियंता हया सवर्गातील पदे प्रतिनियुक्ती व्दारे भरण्यात येतात. मुंबई,पुणे, ठाणे, कोल्हापुर, सोलापुर, अमरावती इ. महानगरपालिकामध्ये ही पदे महानगरपालिके मधील अ अभियंत्या मधुन पदोन्नती देऊन भरण्यात येतात ही पदे महापालिका उप अभियंता मधुन भरणे बाबत शासकिय आदेश देखील निघालेले आहेत. औरंगाबाद महानगरपालिकेत या पदासाठी पात्र उप अभियंते असतांना त्यांना पदोन्नती न देता या पदांवर प्रतिनियुक्ती व्दारे अधिकारी नियुक्त करण्यात येतात. प्रतिनियुक्तीचे अधिकारी दर ३ वर्षानी परिस्थितीचा अनुभव नसतो. त्यामुळे त्यांचेकडुन बऱ्याच तांत्रिक चुका देखील होतात. या महापालिकेतील अ अभियंत्यांना त्यांचा सेवाकाळ जेष्ठता, शैक्षणिक पात्रता, व अनुभव विचारात घेऊन पदोन्नती व्दारे ही पदे भरल्यास महापलिकेच्या उप अभियंत्यांना वरिष्ठ पदावर काम करणेची संधी मिळेल त्याचा प्रदिर्घ अनुभव कामी येईल. तसेच काम घेणाऱ्या तांत्रिक चुका बाबत या अधिकाऱ्यांना जबाबदार धरता येईल महापलिकेत देखील असे अधिकारी तयार होतील महापालिकेत नंतर या पदावर प्रतिनियुक्ती वरील अधिकाऱ्यांना बोलवण्याची गरज भासणार नाही. शहर अभियंता व कार्यकारी अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीचे अधिकारी नियुक्त न करता महापलिकेच्या उप अभियंता संवगामधुन पदोन्नती व्दारे ही पदे . भरणे बाबत प्रस्ताव विचारार्थ व मंजुरिस्तव सादर.

सुचक **:-** १) श्री.प्रदिप जैस्वाल
२) श्री. अविनाश कुमावत
३) श्री.रतनकुमार पंडागळे

अनुमोदक :- १) श्री. धनंजय गंगाखेडकर
२) श्री. तकी हसन खान
३) श्री. विठ्टल पेरकर

४) श्री. केशव सोनवणे
दिनांक :- ८.४.९३

**संवाद**

**श्री. प्रदिप जैस्वाल :-** मंजुर करण्यास हरकत नाही. नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री. बंडु प्रधान,**

**श्री. रतनकुमार पंडागळे** :-अस्थापनेतील मागासवर्गीय कर्मचाऱ्यांमधुन सदरची पदे पदोन्नतीने भरावीत.

**श्री.** प्रकाश जावळे, धनंजय गंगाखेडकर श्री. प्रदिप जैस्वाल : जेष्टतायादी व शासनाचे रोष्टर पध्दतीनुसार कार्यवाही व्हावी

**ठराव क्र. ३/१४९** : प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका आस्थापनेवर शहर अभियंता कार्यकारी अभियंता या सवर्गातील पदे प्रतिनियुक्ती व्दारे भरण्यात येतात. मुंबई,पुणे,ठाणे,कोल्हापुर, सोलापुर, अमरावती इ. ठिकाणी ती पदे उपअभियंता मधुन पदोन्नतीने भरण्यात येतात. ही पदे महापालिका उप अभियंता मधुन भरणे बाबत शासकिय आदेश देखिल निघालेले आहेत. तेंव्हा प्रतिनियुक्तीचे अधिकारी बाहेरुन न बोलवता आस्थपनेतील उप अभियंता या सर्वगामधुन जेष्ठता सुचि व शासनाचे रोष्टर पध्दतीनुसार ही पदे भरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४/१५० :-** हर्सुल येथील सर्वे.नं. १५६/५७ मधील आरक्षणे वगळण्यात यावे. कारण की सदरील सर्वे नंबर मध्ये जवळपास १०० घराची वसाहत असुन त्याठिकाणी सध्या लोक राहत आहे.

तरी त्या ठिकाणी मनपाने जे आरक्षण म्हणजेच खेळाचे मैदान व शाळेसाठी ठेवण्यात आले ते वगळण्यात यावे.

**सुचक :-** श्री. तुळशीराम भगुरे
**अनुमोदक :-** श्री. मिर्झा अन्वर बेग
**दिनांक :-** १६.४.९३.

**संवाद**

**मा. महापौर :-** अनुमोदक नसल्याने सदरील प्रस्ताव पुढील बैठकीत घेण्यात यावा. सदरचा प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ५/१५१ :-** औरंगाबाद शहराचा वाढता व्याप लक्षात घेता विद्युत विभागात सध्या कार्यरत असलेले उप आभियंता (विद्युत) यांचेवर कामाचा प्रचंड ताण पडत असुन त्यांना संपुणे शहरातील विद्युत व्यवसस्थेवर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवणे कठीण होत आहे. सशहराचे विविध भागामधुन बंद विद्युत दिव्याबाबत वाढत्या तक्रारी. नविन वसाहतीमध्ये दैनंदिन सार्यालयीन कामकाज सांभाळणे इ. कामे सुरळीतरित्या पार पाडणेसाठी विद्युत विभागात उप अभियंता (विद्युत) हे नविन पद निर्माण करुन भरणे अत्यंत आवश्यक आहे. जेणे करुन शहरातील बंद विद्युत दिव्याबाबत त्वरीत कार्यवाही केली जाईल. नविन वस्त्यामध्ये विद्युतीकरणाचे काम वेगाने पुर्ण होईल. कार्यरत असलेल्या उप अभियंत्या वरिल कामाचा व्याप कमी होईल विद्युत विभागामधील कामांना गती येऊन सर्व काम सुरळीत वेळेच्या आत पुर्ण होतील. शहरातुन येणाऱ्या नागरिकांना त्रास होणार. नाही. महापालिका विद्युत

विभागात उप अभियंता (विद्युत) चे नविन पद निर्माण करुन कनिष्ठ अभियंता, (विद्युत) यांचे मधुन पदोन्नतीव्दारे भरणे बाबत प्रस्ताव विचारराथ व मंजुरीस्तव सादर

**सुचक :-** श्री. प्रदिपकुमार जैस्वाल
श्री. अविनाश कुमावत

**अनुमादक :-** श्री. धनंजय गंगाखेडकर
श्री. अलफखान हुसैनखान

**दिनांक :-** १६.४.९३.

**संवाद**

**श्री. सुदाम वाघमारे :-** दोन महिन्यापासुन एम एस ई बी कडुन लाईनमनची गॅग मनपाच्या कामास मिळत नाही. याबाबत त्वरीत एम एस ई बी ला कहविणे आवश्यक आहे.

**मा.महापौर :-** ठिक आहे. म.रा.विद्युत मंडळास याबाबत पत्राव्दारे त्वरीत कळविण्याची व्यवस्था व्हावी.

**श्री. अजिजुल्ला बेग :-** प्रशानामार्फत माहिती मिळणे आवश्यक आहे.

**मा.आयुक्त :-** सध्या एक उप अभियंत्याचे पदाचा कार्यभार चालु आहे. परंतु सिडको भागासाठी एक उपअभियंता असणे आवश्यक आहे. पुढे शासनाने मंजुरी दिल्यास याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

**मा.महापौर :-** मंजुर.

**ठराव क्र. ५/१५१ :-** प्रस्ताबात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहराचा वाढता व्याप लक्षात घेता सध्या कार्यरत असलेले उपअभियंता (विद्युत) यांचेवर कामाचा प्रंचड ताण पडत असून विद्युत व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे कठीण होत आहे. यासाठी नविन वसाहतीमध्ये विद्युती करणासाठी चालु असलेली विविध कामे, दैनंदिन कार्यालयीन कामकाज सांभाळणे , ज्यामुळे विद्युत विभागातील कामांना गती येऊन सर्व कामे वेळेच्या आत पुर्ण होतील व शहरातुन येणाऱ्या नागरिकांना त्रास होणार नाही. करीता आस्थापनेतुन जेष्ठता सुचिनुसार कनिष्ठ अभियंता मधुन उपअभियंता पद पदोन्नतीव्दारे भरण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## "*ऐनवेळचे प्रस्ताव*"

**विषय क्र. १/१५२ :-** औरंगाबाद शहर विकास आराखडयाप्रमाणे मो. नागेश्वरवाडी येथील सि.स.नं. ४६४६ ची २६३१.० चौ.मी. क्षेत्रफळाची जागा शैक्षणिक विस्तारासाठी आरक्षित करण्यात आलेली आहे. ही जागा शहराचे मध्यवस्तीत असुन या जागेचा वापर गेल्या १०/१५ वर्षा पासुन रहिवाशी उपयोगा करीता करण्यात येते आहे. या ठिकाणी बांधण्यात आलेल्या घरांवर मनपा कडुन मालमत्ता कर ही वसुल केला जातो. या बाबीचा विचार करता मो. नागेश्वरवाडी येथील सि.स.नं. ४६४६ ची २६३१.० चौ.मी. क्षेत्रफळाची जागा शहर विकास आराखडयाचे शैक्षणिक विस्तार या प्रयोजनातुन वगळुन रहिवाशी उपयोगी या प्रयोजना करिता उपयोगास आणण्याची परवाणगी द्यावी.

**सुचक :-** ॲड. इगबालसिंग गिल

**अनुमादक :-** विठ्ठल पेरकर
**दिनांक :-** १७.४.९३.

**संवाद**
**मा.महापौर :-** मंजुर

**ठराव क्र. १/१५२ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर विकास आराखडयाप्रमाणे मु. नागेश्वरवाडी येथील सि.स.नं. ४६४६ची २६३१.०० चौ.मी. क्षेत्रफळाची जागा शैक्षणिक विस्तारासाठी आरक्षीत करण्यात आलेली आहे. या वस्तीमध्ये गेलया १०/१५ वर्षापासुन रहिवाशी उपयोगाकरिता करण्यात येत आहे. या घरावर मनपाकडुन मालमत्ता करही वसुल केला जातो. या बाबीचा विचार करता सि.स.नं. ४६४६ ची २६३१ चौ.मी. क्षेत्रफळाची जागा शहर विकास आखडयाचे शैक्षणिक विस्तार या प्रयोजनातुन वगळुन रहिवाशी उपयोगी या प्रयोजनाकरिता उपयोगात आणण्याची परवानगी सर्वानुमते देण्यात येत. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२/१५३ :-** शासनाने महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिकेतील आयुक्तांना रु.३ लाखाचे अधिकार दिलेले आहेत. परंतु औरंगाबाद महानगरपालिका ही इतर महानगरपालिकेच्या तुलनेने "क" वर्गात मोडत असल्याने या शहरातील लोकप्रतिनीधी यांना रु.३ लाखाची वरिल कामे करणे शक्य नाही. बरेचसे कामे रु.३ लाखाचे आतिलच असतात. त्यामुळे नविन जी.आर च्या आधारे औरंगाबाद महापालिकेतील आयुक्तांना रु.३ लाखाचे अधिकार न देता पुर्वी जे १ लाखाचे अधिकार होते तेच ठेवण्यात यावे व लोकप्रतिनिधींना शहराचा विकासाचे योग्य रितिने काम करण्याची संधी द्यावी. लोकप्रतिनिधींचा हक्क डावलु नये.
**सुचक :-** श्री.विठ्ठल पेरकर
**अनुमादक :-** श्री. नारायण फत्तेलष्कर
**दिनांक :-** १७.४.९३.

**सवाद**
**मा.महापौर :-** मंजुर

**ठराव क्र.२/१५३ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शासनाने महाराष्ट्र राज्यतील सर्व महानगरपालिकेतील आयुक्तांना रु.३ लाखाचे अधिकार दिलेले आहेत परंतु औरंगाबाद महानगरपालिका ही इतर मनपाच्या तुलनेने "क" वर्गात मोडत असल्याने या शहरातील लोकप्रतिनिधींना रु.३ लाखाच्या वरील कामे करणे शक्य होत नाही. तर बरेचसे कामे.रु. ३ लाखाच्या आतिलच असतात तेंव्हा नविन जी आरच्या आधारे औरंगाबाद मनपातील आयुक्तांना रु ३ लाखाचे अधिकार न देता पुर्वी जे रु. १ लाखाचे अधिकार होते तेच ठेवण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३/१५४ :-** औरंगाबाद शहरातुन विविध खेळांत प्रविण्य मिळवुण राष्ट्रीय व राज्य पातळीवर निवड होणाऱ्या खेळांडुना आर्थिक मदत देण्यासाठी व इतर चांगल्या कार्यासा मदत करण्यासाठी महापौर यांना एक लाखाऐवजी पाच लाखाची तरतुद असणे बाबत कार्यवाही व्हावी.

**सुचक :-** श्री. मोतीराम घडामोडे
**अनुमोदक :-** श्री. इगबालसिंग गिल
**दिनांक :-** १९.४.९३.
**संवाद**
**मा.महापौर :-** मंजुर

**ठराव क्र. ३/१५४ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातुन विविध खेळात प्राविण्या मिळवुण राष्ट्रीय व राज्य पातळीवर निवड होणाऱ्या खेळांडुना आर्थिक मदत देण्यासाठी व इतर चांगल्या कार्यास मदत करण्यासाठी क्रिडा विभागात वाढीव तरतुद करुन महापौर यांना रु.१ लाखाऐवजी रु.५ लाख खर्च करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४/१५५ :-** शहिद भगत सिंग क्रिडा व युवक मंडळ हे एक रजिस्टर्ड संस्था असुन त्याचे क्र.र.नं. महाराष्ट्र ६३/१९८६ नोंदणी अधिनियम १८६० अन्वये आहे. तरी त्यांना श्रेयनगर येथील जागा बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम १३.३.१.३ (१) अन्वये रेखांकनाच्या खुल्या जागेच्या १० टक्के द्यावी.
**सुचक :-** श्री. तुळसीराम भुगरे
**अनुमोदक :-** श्री. राधाकिसन माटे
**दिनांक :-** २०.४.९३.
**संवाद**
**मा.महापौर :-** मंजुर

**ठराव क्र.४/१५५ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहिद भंगतसिंग क्रिडा व युवक मंडळ ही एक रजिस्टर्ड संख्या असुन तिचा क्र. र. नं. महाराष्ट्र ६३/१९८६ नोंदणी अधिनियम १८६० अन्वये आहे. तरी श्रेयनगर येथील जागा बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीच्या नियम १३.३.१.३ (१) अन्वये रेखांकनांच्या खुल्या जागेच्या १० टक्के जागा ९९ वर्षाच्या भाडेपट्टयावर मनपाच्या नियम व अटीनुसार देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५/१५६ :-** औरंगाबाद महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी श्री. मनोहरराव कुलकर्णी हे मे १९९३ अखेर सेवानिवृत्त होत आहे. त्यांचे जागेवर शिक्षणाधिकारी म्हणुन नियुकतीसाठी शासनाकडुन अनुभवी अधिकाऱ्यांची नांवे मागविण्यात यावी व त्यातुन एकाची शिफारस करुन निवडीसाठी शासनास विनंती करण्यात यावी यासाठी वेळ लागणार आहे म्हणुन तो पर्यन्त सध्याचे कार्यरत असलेले शिक्षणाधिकारी श्री. मनोहरराव कुलकर्णी यांना दि.१ जुन १९९३. पासुन पुननियुक्ती नविन शिक्षणधिकारी येई पर्यन्त अथवा ६ महिने पर्यन्त मुदतवाढ देण्यात यावी. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर
**सुचक :-** श्री. धनंजय गंगाखेडकर
**अनुमोदक :-** श्री. अजिमखाँ दादामियाँ, श्री. प्रदिपकुमार जैस्वाल
**दिनांक :-** १७.४.९३.
**संवाद**
**श्री.प्रकाश जावळे**
**श्री. सुदाम वाघमारे**

**श्री. मधुकर शिंदे :-** शिक्षणाधिकारी हे सेवानिवृत्त होत आहेत. तर त्यांच्य जागी कर्मचाऱ्यांची पदोन्नतीने भरती करावी.

**श्री. धनंजय गंगाखेडकर**

**श्री. प्रदिप जैस्वाल :-** सेवानिवृत्त जरी झाले असेल तरी पुन्हा सहा महिन्याचा कालावधी वाढवुन देण्यास काहीही हरकत नाही. यासाठी उदा. देता येईल. (चिंपुळणकर) सारखे.

**श्री. प्रकाश जावळे :-** अशा प्रकारचा निर्णय घेऊन इतर कर्मचाऱ्यांवर एकप्रकारे गदा आणणे होय.

**श्री. सुदाम वाघमारे :-** या प्रस्तावात माझा विरोध आहे शिक्षणाधिकारी यांना मनपाच्या शाळा किती व त्या शाळा कुठे कुठे आहेत त्यांचे अगोदर पत्ते सांगावे यावरुनच त्यांची कार्यपध्दती दिसुन येते.

**श्री. मधुकर शिंदे :-** शिक्षणाधिकारी यांची अशी विशेष कार्यप्रनाली काय आहे याची माहिती द्यावी.( यावेळी सभागृहात या विषयावर स.स.आपसात बोलतात काहीही ऐकु येत नाही)

**श्री. सुदाम वाघमारे :-** शिक्षणाधिकारी यांची सेवा सपल्यानंतर त्यांना पुन्हा मुदतवाढ देणे योग्य नाही. त्यांच्या काळात कोणतेही चांगले काम झालेले नाही.

**श्री. प्रकाश जावळे :-** शिक्षणाधिकारी यांना मुदत वाढ देण्यापेक्षा जेष्ठता यादीनुसार इतर कर्मचाऱ्यांची निवड व्हावी. परंतु सेवानिवृत्त झाल्यानंतर पुन्हा वाढ दिल्यास पायडा पडण्याची शक्यता आहे. याचा विचार होणे आवश्यक आहे.

**मा.महापौर :-** आपण सर्वानुमते जो निर्णय घ्याल तो मान्य करण्यात येईल.

**श्री. सुदाम वाघमारे**

**श्री. मधुकर शिंदे**

**श्री. प्रकाश जावळे :-** शिक्षणाधिकारी यांना पुन्हा मदतवाढ देण्यास आमचा विराध असुन तशी नोंद व्हावी. (यावेळी विरोध करुन स.स. (तिघेही) सभात्याग करतात. अंदाजे वेळ २.४५ वाजता)

**मा.महापौर :-** ठिक आहे.मंजुर

**ठराव क्र.५/१५६ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाचे शिक्षणाधिकारी श्री. मनोहरराव कुलकर्णी हे मे १९९३ अखेर सेवानिवृत्त होत आहे. त्यांचे जागेवर शिक्षणाधिकारी म्हणुन नियुक्तीसाठी शासनाकडुन अनुभवी अधिकाऱ्यांची नांवे मागविण्यात यावी व त्यातुन एकाची शिफारस करावी. तोपर्यन्त मध्याचे कार्यरत असलेले शिक्षणाधिकारी नविन शिक्षणाधिकारी येईपर्यन्त अथवा सहा महिनेपर्यन्तची मुदतवाढ करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६/१५७ :-** सिध्दार्थ मित्र मंडळाच्या वतीने आयाजित केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला वर्ष ५ वे चे दिनांक १२.४.९३ रोजी आपण केलेल्या उदघाटनपर भाषनात मंडळास उपरोक्त प्रकल्पास सहकार्यच्या भावनेने औरंगाबाद महानगर पाहिलकेच्या हद्दीतील ले आऊट प्लॉन मधील खुल्या जागेतील १/१० भाग देण्याचे आश्वासन दिलात तयाबद्दल मंडळ आपले आभारी आहे.

विनंती येणे प्रमाणे आहे की मंडळास औरंगाबाद शहरातील महानगरपालिकेच्या मालकांची खालील नमुद ले आऊट प्लॉन मधील लाल रंगाने निर्देशीत केलेल्या खुल्या जागेतुन १/१० जागा कोणत्याही एका प्लॉन मधुन मंडळास देऊन उपकृत करावे ही विनंती.

मंडळ आपले मनस्वी आभारी राहिल.

(१) ले आऊट क्र.LYTAGO१/२५४० Builders Hosing
Date ५.३.१९९३ society S No३०/B Shantipura Aurangabad
(२) ले आऊट क्र LYT/AGD/७७४ S.No. ५० Al sangita Colony
Date : ५.५.८२ Bhasingpur Auranganabad
**टिप :-** दोन्ही ले आऊटच्या प्रति सोबत जोडल्या आहेत.
**सुचक :-** श्री. प्रदिपकुमार एस.
**अनुमोदक :-** श्री. ॲड. इगबालसिंग गिल
**दिनांक :-** १९.४.९३.
**संवाद**
**मा.महापौर :-** मंजुर
**ठराव क्र. ६/१५७ :-** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ मित्र मंडळ ८५ एकनाथ नगर औरंगाबाद ही नोंदणीकृत संस्था असुन तिचे क्र.११७/७३ एफ ३१९ दिनांक :- १४.४.७३ असा आहे. या मंडळाच्या वतीने लोक उपयोगी प्रकरल्पासाठी औरंगाबाद मनपाच्या हद्दीत बिल्डर्स हाऊसिंग सोसायटी सि.न.३०/बी शांतीपुरा औरंगाबाद येथील खुली जागा जिचा ले आऊट क्र.१/२५४० दि. ५.३.१९६३ अन्वये उत्तरेस असलेले जिचे क्षेत्रफळ १८९५.९१ चौ.मी. असुन या रेखांकनाच्या खुल्या जागेच्या १० टक्के जागा ९९ वर्षाच्या भाडेपट्टयांनी व मनपाच्या अटी व नियमाप्रमाणे संबंधित सस्थेस देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.
**" जन गण मन" राष्ट्र गिताने सभा संपली**

**सचिव**
**महानगरपालिका,औरंगाबाद.**

**मा.महापौर**
**महानगरपालिका, औरंगाबाद.**

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**मंगळवार दिनांक २९.४.१९९३ रोजी भरलेल्या विशेष सर्वेसाधारण सभेचे इतिवृत्त शुक्रवार दिनांक २९.४.९३ रोजी सकाळी ११.३० वाजता मा.महापौर श्री. अशोक यादव सायन्ना यांच्या अध्यक्षतेखाली महानगपालिका संचलित "नगर भुवन" (टाऊन हॉल) येथे विशेष सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली.**

**त्या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) मा.श्री. अजिमखान दादामीयाँ अ. रहेमान
२) मा.श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव
३) मा.श्री. विधाते प्रभाकर सिताराम

४) मा.श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
५) मा. श्री. पंडागळे रतनकुमार नारायणराव
६) मा.श्री. गंगाखेडकर धनंजय मनोहरराव
७) मा.श्री. सोनवणे केशव काशीनाथ
८) मा.श्री. भुगरे तुळसीराम छगन
९) मा.श्री. सुर्यवंशी महादेव पुडलीक
१०) मा.श्री. पाटील नरेंद्र यादवराव
११) मा.श्री. घडामोडे मोतीराम नारायणराव
१२) मा.श्री. म. आयुब गुलाम जिलानी
१३) मा.श्री. मुजिब आलमशा खान
१४) मा.श्री. प्रधान बंडु गोविंदराव
१५) मा.श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
१६) मा.श्री. तकीहसन खान कासिम हसन खान
१७) मा.श्री. स. अहमद एकबालुद्दीन स.मो.कुतुबुद्दीन
१८) मा.श्री. मिर्झा अन्वर बेग हमीद बेग
१९) मा.श्री. ओक जयवंत केशवराव
२०) मा.श्री. गील इगवालसिंग प्रितमसिंग
२१) मा.श्री. बंजारे पीटर प्रभाकरराव
२२) मा.श्री. अ. रशिद खान (मामु) अ. हमीदखान
२३) सौ. दलाल लता श्रीनिवास
२४) मा.श्री. जैस्वाल प्रदिप शिवनारायण
२५) मा.श्री. खैरे चंद्रकांत भाऊराव
२६) मा. श्री. हाजी मोहंम्मद हफीजोद्दीन
२७) मा. श्री. छापरवाल रमेश नारायण
२८) मा.श्री. पालिवाल विजय गोविंदलाल
२९) मा.श्री. डॉ. संचेती चेनकरण गणेशलाल
३०) मा.श्री. म.इस्माईल अ.करीम
३१) मा.श्री. फैयाजखान अहमद खान
३२) मा.श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
३३) मा.श्री. मोहसिन अहमद बशीर अहमद
३४) मा.श्री. स.हुसेन स. अहमद
३५) मा.श्री. मगर शंकर जिजाराम
३६) मा.श्री. मानकापे नामदेवराव शामराव
३७) मा.श्री. पैठणकर पांडुरंग भिकाजी
३८) मा.श्री. सुग्रीम हरलाल रिडलान
३९) मा.श्री. अलफखान हुसेनखान
४०) मा.श्री. वाघमारे सुदाम भानुदास
४१) मा.श्री. पेरकर विठ्ठल कोंडाजी
४२) मा.श्री. थोरात किशोर गोविंदराव
४३) मा.श्री. सावे मोरेश्वर दिनानाथ
४४) मा.श्री. शिंदे मधुकराव माणिकराव
४५) मा.श्री. डॉ. काळे शांताराम यशवंतराव

४६) मा.श्री. दत्त प्रदिपकुमार एस.
४७) मा.श्री. ओबेरॉय मनमोहसिंग करमसिंग
४८) मा.श्री. बारवाल गजानन रामकिसन
४९) मा.श्री. गोडसे आनंद जगदीश
५०) मा.श्री. जहागिरदार अजिज मुस्तार अहमद
५१) मा.श्री. मोरे राधाकृष्ण तुळशीराम
५२) मा.श्री. जावळे प्रकाश शिवराम
५३) मा.श्री. गाडे गंगाधर सुखदेव
५४) मा.श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
५५) मा.श्री. कुमावत अविनाश लक्ष्मणराव
५६) मा.श्री. परदेशी सुभाष शिवलाल
५७) मा.श्री. नवपुते कचरु चंद्रभान

**विषय क्र.१/१५८ :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (१) व (५) व कामकाज नियमावलीचा नियम क्र. ५९ अन्वे स्थायी समितीच्या दहा (१०) सभासदांची निवड करणे.

**संवाद**

**श्री. मोरेश्वर सावे :-** दिनांक २६.४.९३ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या विमान दुर्घटने बाबत दुखवटा ठराव घेऊन या दुर्घटनेत मृत्यु पावलेल्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

**श्री. डॉ. शांताराम काळे :-** स. सभासंदांनी मांडलेल्या सुचनेस माझे अनुमोदन आहे. सोमवार दिनांक २६.४.९३. रोजी विमान अपघातात मृत्यु पावलेल्या नागरिकांच्या कुटुंबियाचे दुःखात हे सभागृह. सहभागी आहे तसेच या आकस्मित दुर्घटनेत मृत्यु पावलेल्या सर्व नागरिकांना सभागृहातर्फे ०२ मिनिटे श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

**श्री. अविनाश कुमावत :-** दिनांक २६.४.९३. रोजी झालेल्या विमान अपघात स्थळी बजाज कंपनीने कामगार श्री. मछिंद सोनवणे व त्यांचे मित्र यांनी प्रथम रुग्ण वाहिका नेऊन अपघात ग्रस्तांची मदत केल्यामुळे संबंधितांना महापालिकेतर्फे पशिस्ती पत्र देण्यात यावे.

**श्री. चंद्रकांत खैरे :-** स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे बजाज कंपनीचे कामगार श्री. मंछिद्र सोनवणे व त्यांचे सहकारी यांना प्रशिस्ती पत्र देतांना त्यांचे आभिनंदन करण्यात यावे.

**मा.महापौर :-** दिनांक २६.४.९३. रोजी आकस्मितरित्या घडलेल्या दुर्घटनेच्या वेळी ज्या ज्या संघटना नागरिंक, कामगार व अन्य यांनी मदत केली आहे अशा सर्व संघटना, नागरिक, कामगार व अन्य यांना प्रशिस्ती पत्र देण्यात येईल.

**मा.सचिव :-** स्थायी समितीच्या दहा सदस्यांच्या निवडी करिता एकुण २९ वैध उमेदवारी अर्ज प्राप्त झालेले आहे. त्यापैकी आतापर्यन्त तीन उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहे. त्यामुळे दहा सदस्यांच्या निवडी करिता एकुण २६ उमेदवार आहे (उमेदवारांची यादी वाचुन दाखविली)

**मा.महापौर :-** स्थायी समितीच्या दहा सभासदांच्या निवड करिता प्राप्त झालेल्या अर्जापैकी ज्या उमेदवारांना आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यासाठी वेळ देण्यात येतो. वेळ अंदाजे १२.०० वाजता.

**मा.महापौर :-** उमेदवारी अर्ज परत घेण्याची वेळ संपलेली आहे तेंव्हा सचिवांनी यादी प्रसिध्द करावी.उमेदवारी अर्ज परत घेतल्या नंतर उर्वरित उमेदवारांची यादी मा.सचिवांनी सभागृहात वाचुन दाखविली.

**मा. महापौर :-** २६ उमेदवारी अर्जा पैकी १६ सभासदांनी आपली उमेदवारी परत घेतल्यामुळे स्थायी समितीच्या १० जागा करिता १० उमेदवारी अर्ज आहे. त्यामुळे स्थायी समितीच्या १० जागा करिता बिन विरोध निवड झाल्याचे घोषित करण्यात येते.

**ठराव :-** स्थायी समितीच्या १० जागाकरिता प्राप्त झालेलया एकुण २९ उमेदवारी अर्जापैकी १९ उमेदवारांनी आपली उमेदवारी परत घेतल्यामुळे स्थायी समितीच्या जागाकरिता सर्व श्री. जावळे प्रकाश शिवराम श्री. परदेशी सुभाष शिवलाल, श्री. पालिवाल विजय गोविंदलाल, श्री. प्रधान बंडु गोविंदाव श्री. फैय्याजखान अहमदखान श्री. महंमद अयुब गुलाम जिलानी, श्री. मानकापे नामदेव शामराव, श्री. प्रभाकर विधाते, श्री. शेळके अजितकुमार लक्ष्मणराव आणि सुर्यवंशी महादेव पुंडलिक या सभासदांची सर्वानुमते बिनविरोध निवड झालयाचे घोषित केले. वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर "जन गन मन" या राष्ट्रगिताने नंतर सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| **स्वाक्षरीत/-** | **स्वाक्षरीत/-** |
| **सचिव** | **मा. महापौर** |
| महानगरपालिका,औरंगाबाद. | महानगरपालिका,औरंगाबाद. |